निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे

ता. साक्री जि. धुळे

* नॅक प्रमाणित *



# ज्ञानदीप

वार्षिक नियतकालिक - २०१७-२०१८

# आदर्श कला महाविद्यालय

## निजामपूर - जैताणे ता. साक्री जि. धुळे

*** नॅक पुर्नप्रमाणित ***

# ज्ञानदिप

**वार्षिक नियतकालिक**

**२०१७-१८**

**संपादक**

**डॉ. सुधाकर एल. जाधव**

**सदस्य**

**डॉ. विजय ग. गुरव**

**सदस्य**

**डॉ. रविंद्र पी. ठाकरे**

**सदस्य**

**प्रियंका पी. सुलाखे**

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | :- | आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,<br>ता. साक्री जि. धुळे |
| प्रकाशन काळ | :- | वार्षिक |
| प्रकाशक | :- | प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार |
| राष्ट्रीयत्व | :- | भारतीय |
| पत्ता | :- | आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,<br>ता. साक्री जि. धुळे |
| संपादक | :- | डॉ. सुधाकर एल. जाधव |
| राष्ट्रीयत्व | :- | भारतीय |
| पत्ता | :- | आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,<br>ता. साक्री जि. धुळे |
| मुद्रक | :- | ऋद्र क्रिएशन्स,<br>माणिक चौक, शिरीष कुमार स्मारक समोर,<br>नंदुरबार ता.जि. नंदुरबार. मो. ९८२३७२४७०५ |


(सदर अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही)

# निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

## ❋ सन्माननीय सदस्य ❋

| अ.क्र. | सन्मानीय सदस्यांचे नांव | | हुद्दा |
|---|---|---|---|
| १) | मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील | - | अध्यक्ष |
| २) | मा.बाबासो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष, वरीष्ठ महाविद्यालय |
| ३) | मा.भाईसो. श्री. सुहास विष्णूदास शाह | - | उपाध्यक्ष |
| ४) | मा.भाईसो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष, शालेय समिती |
| ५) | मा.दादासो. श्री. बारीक यादव पगारे | - | सदस्य |
| ६) | मा.नानासो. श्री. दत्तात्रय जगन्नाथ वाणी | - | खजिनदार |
| ७) | मा.भाईसो. श्री. नितीनकुमार मणिलाल शाह | - | सचिव |
| ८) | मा.भाईसो. श्री. किशोर शांतिलाल शाह | - | सहसचिव |
| ९) | मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी साहेब | - | सदस्य |
| १०) | मा.दादासो. श्री. राजेंद्र जगन्नाथ वाणी | - | सदस्य |
| ११) | मा.आप्पासो. श्री. राजेंद्र मुरलीधर वाणी | - | सदस्य |
| १२) | मा.दादासो. श्री. राघो बळीराम पगारे | - | सदस्य |

# आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे

## ❋ सन्माननीय सदस्य ❋

| अ.क्र. | सन्मानीय सदस्यांचे नांव | | हुद्दा |
|---|---|---|---|
| १) | मा.बाबासो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष |
| २) | मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील | - | सदस्य |
| ३) | मा.भाईसो. श्री. नितीनकुमार मणिलाल शाह | - | सदस्य |
| ४) | मा.नानासो. श्री. दत्तात्रय जगन्नाथ वाणी | - | सदस्य |
| ५) | मा.भाईसो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह | - | सदस्य |
| ६) | मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी साहेब | - | सदस्य |
| ७) | मा.प्राचार्य डॉ. अशोक पितांबर खैरनार | - | सचिव |

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

※ नॅक पुर्नप्रमाणित ※

**※ आमचे श्रद्धास्थान ※**

अध्यक्ष - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.काकासो.श्री. दशरथ नारायण पाटील**

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

❋ नॅक पुर्नप्रमाणित ❋

**❋ आमचे प्रेरणास्थान ❋**

अध्यक्ष - आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे



## मा.बाबासो.ॲड.श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

✼ नॅक पुर्नप्रमाणित ✼



प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

# निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननिय पदाधिकारी

**निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे**

अध्यक्ष - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील**

अध्यक्ष - आदर्श कला महाविद्यालय
सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.बाबासो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह**

उपाध्यक्ष - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.भाईसो. श्री. सुहास विष्णुदास शाह**

अध्यक्ष, शालेय समिती निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.भाईसो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह**

सदस्य – निजामपूर–जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ



**मा.दादासो. श्री. बारीक**
**यादव पगारे**

खजिनदार निजामपूर–जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य – आदर्श कला महाविद्यालय



**मा.नानासो. श्री. दत्तात्रय**
**जगन्नाथ वाणी**

सचिव – निजामपूर–जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ
सदस्य – आदर्श कला महाविद्यालय



**मा.भाईसो. श्री. नितीनकुमार**
**मणिलाल शाह**

सहसचिव – निजामपूर–जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ



**मा.भाईसो. श्री. किशोर**
**शांतीलाल शाह**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी साहेब**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.दादासो. श्री. राजेंद्र जगन्नाथ वाणी**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.आप्पासो. श्री. राजेंद्र मुरलीधर वाणी**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.दादासो. श्री. राघो बळीराम पगारे**

# महाविद्यालय विकास समिती सदस्य



डॉ. सुधाकर लो. जाधव
(सदस्य)



डॉ. रविन्द्र पो. ठाकरे
(सदस्य)



प्रा. कांतीलाल दा. सोनवणे
(सदस्य)



डॉ. विजय ग. गुरव
(सदस्य)



श्री. अशोक द. खैरनार
(सदस्य)



प्रा. आतिश मेश्राम
(सदस्य)



डॉ. प्रियंका पी. सुलाखे
(सदस्य)



सौ. छाया बळीराम अहिरे
(सदस्य)

# प्राचार्यांचे मनोगत

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चा **"ज्ञानदीप"** नियतकालिक अंक आपल्या हाती सुपूर्त करतांना मला मनस्वी आनंद होत आहे. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विद्यार्थ्यांना अधिक ज्ञान मिळावे यासाठी विविध महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या दृष्टीकोनातून "सांस्कृतिक कार्यक्रम" व "युवारंग" सारखे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांवने महाविद्यालयाला Academic Audit मध्ये 'A' Grade बहाल केले. याचा आम्हांला सार्थ अभिमान आहे.

ज्ञानाबरोबर श्रमाचे महत्त्व रूजावे म्हणून आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १०० तास स्वच्छता मोहीम यशस्वीतेने राबविली व समाजसेवेचा वसा घेतला. विद्यार्थ्यांमधील साहित्यिक विकसीत व्हावेत, त्यांना लेखनाची आवड निर्माण व्हावी, त्यांची सृजनशीलता जपावी यासाठी **"ज्ञानदीप"** चा अंक प्रकाशित केला जातो. त्यात विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कविता, कथा, वैचारिक लेख व संकलित लेख यांचा समावेश आहे. विद्यार्थी लेखकांचे अभिनंदन व त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा. **"ज्ञानदीप"** तयार करतांना मा. व्यवस्थापन मंडळ नि.जै. शिक्षण प्रसारक मंडळ आदर्श कला महाविद्यालय व्यवस्थापन समितीची प्रेरणा व महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक बंधू-भगिनींचे सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांच्या ऋणात राहू इच्छितो.

धन्यवाद!

**प्रा.डॉ.अशोक पी. खैरनार**
प्राचार्य
आदर्श कला महाविद्यालय
निजामपूर-जैताणे

*****

# संपादकीय....

प्रिय वाचक मित्र हो,

महाविद्यालयीन अंतरंगाचे प्रतिबिंब आपणापर्यंत पोहोचविण्याचे एक प्रभावी माध्यम म्हणजे **'ज्ञानदीप'** हे नियकालीक होय. आदर्श कला महाविद्यालयाने संपूर्ण शैक्षणिक वर्षात घेतलेले उपक्रम आणि मिळवलेला नावलौकीक यात प्रतिबिंबीत झालेला असतो. ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाबरोबर व्यक्तीमत्व विकासाची संधी उपलब्ध करून देणारे एक सक्षम दालन म्हणून आदर्श महाविद्यालयाकडे पाहिले जाते.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ हे आदर्श महाविद्यालयाच्या दृष्टीने एक संस्मरणीय वर्ष ठरले. भारत भरातल्या महाविद्यालयांचे मूल्यांकन व प्रामाण्यीकरण करणारी बंगलोर येथील नॅक संस्था कोणत्या निकषावर मूल्यांकन करते. या बाबीचे प्रशिक्षण देणारी राज्यस्तरीय कार्यशाळा आदर्श महाविद्यालयाने आयोजित केली. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी कटीबद्ध असणारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पितांबर खैरनार यांचे कौतुक केले.

ग्रामीण व आदिवासी बहुल क्षेत्रातून महाविद्यालयात येणाज्या युवकांना मूल्य शिक्षण, स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा या वृत्ती अवगत व्हाव्या म्हणून आदर्श महाविद्यालयाने विविध उपक्रम राबविले. मौजे आमखेल या गावी राष्ट्रीय सेवा योजनेचे साप्ताहिक श्रमसंस्कार शिबीर आयोजित केले. मा.प्राचार्य ए.पी. खैरनार यांनी या दरम्यान एक अभिनव उपक्रम राबविला. महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागातील डॉ. सु.लो. जाधव यांना कुटुंब सर्व्हेक्षणाची अनुसूची तयार करायला सांगुन संपूर्ण आमखेल गावाचे सर्व्हेक्षण स्वयंसेवकांनी करून विद्यापीठाला अहवाल सादर केला. या आगळ्या-वेगळ्या कार्याची दखल विद्यापीठ पातळीवर घेतली गेली ही कौतुकाची बाब म्हणावी लागेल.

ग्रामीण भागात विद्यादान करणारे आदर्श महाविद्यालय हे एक सक्षम पिढी निर्माण करणारे महाविद्यालय व्हावे, यासाठी निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ वेळोवेळी सहकार्य करीत असते. मी संपादक म्हणून त्यांच्या ऋणात राहू इच्छितो. हा **'ज्ञानदीप'** अंक आकाराला येण्यासाठी ज्या-ज्या घटकांनी सहकार्य केले त्या समस्त सज्जनांचे आभार.

धन्यवाद!

**डॉ. सुधाकर एल. जाधव**

सहाय्यक प्राध्यापक

आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर जैताणे

*****

# ۞ अंतरंग ۞


- छ. शिवाजी महाराजांचा पहिला राज्याभिषेक (६ जुन १६७४) - कु. जाधव अश्विनी
- महाराणी ताराबाई - कु. राणे गायत्री अनिल
- छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक क्रांतीविषयी विचार - वाकसे काळू कोंडू
- पंचायतराज व्यवस्थेतील बदल आणि ग्रामीण विकासाचे राजकारण - वसावे रविता किर्ता
- भारतातील समाजातील स्त्रियांची बदलती स्थिती - गवळे माधुरी दिलीप
- आरोग्याच्या चांगल्या सवयी - कु. वळवी प्रियंका खुमा
- खेळातुन शारिरीक क्षमतांचा विकास - कु. वसावे रविता मांग्या
- संत गोरा कुंभार.... (इ.स. १२६७ - १० एप्रिल १३१७) - कु. अहिरे मालती ब्रिजलाल
- संत सावता माळी... (जन्म इ.स. १२५०; समाधी इ.स. १२९५) - वसावे अजय रुबजी
- सायबर युद्ध किंवा संगणक युद्ध किंवा माहिती तंत्रज्ञान युद्ध - संदिप मोतीराम भिल
- १९६२ चे भारत - चीन सीमा युद्ध - कु. हिरे दिपाली संतोष
- खेळ व जीवन - कु. वसावे रविता मांग्या
- युग-पुरुष गुरुनानकदेव - कु. मोहने मिना हेमंत
- विद्यार्थी जीवन - कु. जाधव रुपाली हरिष
- **William Wordsworth As a Romantic Poet - Miss. Sushma Suryawanahi**


## अहवाल विभाग


- विद्यार्थी विकास अहवाल
- राष्ट्रीय सेवा योजना
- युवती स्वयंसिद्धा कराटे शिबीर
- युवती व्यक्तीमत्व विकास चर्चासत्र
- **Department of English**
- मराठी विभाग
- समाजशास्त्र विभाग
- संरक्षण आणि सामरिक शास्त्र
- राज्यशास्त्र विभाग
- इतिहास विभाग
- भूगोल विभाग
- क्रीडा विभाग
- **Personal Report - Ajabrao Ingle**
- वैयक्तिक अहवाल - डॉ. विजय ग. गुरव
- वैयक्तिक अहवाल - प्रा. प्रणव गरूड
- विविध शैक्षणिक समित्या
- प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद यादी

# छ. शिवाजी महाराजांचा पहिला राज्याभिषेक (६ जुन १६७४)



जेष्ठ शुद्ध १३ शनिवार ता. ६ जुन १६७४ रोजी रायगडावर महाराजांचा राज्याभिषेक झाला. या समारंभास शुक्रवारी सायंकाळी सुरुवात झाली व शनिवारी सकाळी कार्यक्रम संपला. महाराज व सोयराबाई यांचा राज्याभिषेक मंडपात कार्यक्रम सुरु झाला. सर्व प्रथम गणेशपुजन, स्वतिपुजन, मंडप पुजन, महावेदीचे पूजन, विविध कुंभ, तुप, दुध, व जल भरुन मंडपाच्या सर्व दिशांना ठेवले. देशातील अनेक पवित्र नद्यांचे जल भरुन आणले होते. महावेदीवर अग्निदेवता व ग्रह यांची प्रतिष्ठा केली. वेदमंत्रांच्या घोषात होमहवन झाले. नंतर महाराजांनी समंत्र स्नान केले व पंचामृत केले. विधीपूर्वक महाराज आसनारुढ झाले. अग्निपूजा केली. नंतर अभिषेक शाळेत गेले व अभिषेकाला सुरुवात झाली.

सोन्यापासून तयार केलेल्या आसनावरुन महाराज बसले. सोयराबाई, संभाजी हे दुसऱ्या आसनावर बसले. अष्ट प्रधान मंडळाचे सभासद आठही दिशांना उभे होते. आग्नेय दिशेला अण्णाजी पंत छत्र घेवून उभे होते. दक्षिणेला हंबीराव मोहित दूधाने भरलेला रौप्य कलश घेवून उभे होते. पश्चिमेला रामचंद्रपंत अमात्य दहयाने भरलेला तांब्याचा कलश घेवून उभे होते. वायव्येला दत्ताजीपंत मोर्चेल घेवून उभे होते. या सर्वाच्या साक्षीने मंत्र घोषात पटराणी व युवराज यांच्यावर अभिषेक केला. वाद्यांच्या मोठ्या गजरात सोळा ब्राम्हण सुवासिनींनी महाराजांना ओवाळले.

महाराजांनी पुन्हा स्नान करुन काशाच्या परातीत तुपात आपले मुख्य पाहिले. दागिने, अलंकार, वस्त्र परिधान करुन डोळ्यावर मंदिल बांधला. नंतर शस्त्रास्त्रांची व देवाची पुजा केली. वडीलधारी मंडळींना वंदन केले व महाराज राजसभेत सिंहासनावर रुढ व्हावयास निघाले. महाराजांचे सिंहासन आकर्षक होते. सिंहासनाच्या आठ दिशांना रत्नजडीत स्तंभ होते. महाराजांच्या डोळ्यावरील छत्र जडजवाहीरांचे व मोतींच्या झालरीचे होते. हे सिंहासन ३२ मण सोन्याचे होते. सिंहासनाच्यां दोन्ही बाजुला सुवर्णांकीत भाल्याच्या टोकावर अनेक अधिकार दर्शक व राजसत्तेची चिन्हे होती. उजव्या हाताला दोन मोठ्या दातांच्या मत्स्यांची सुवर्णाची शिरे होती. डाव्या हाताला सोन्याच्या तराजुची पारडी न्यायचिन्ह म्हणून चमकत होती. असे राज्यरोहण प्रसंगी हजर असलेले ऑकर्झडन म्हणतो. सभागृहाच्या प्रवेशद्वारी दोन शुभलक्ष्मी हत्ती सुवर्णालंकारासह उभे होते.

ब्राम्हण पंडीत, चिटणीस, अष्टप्रधान मंडळ यांच्या सह महाराजांनी सभागृहात शुभवेळी प्रवेश केला. सिंहासनाजवळ येताच त्यास वंदन करुन त्याला पद् स्पर्श न होऊ देता वेदमंत्र्यांच्या घोषात महाराज सिंहासनाआरुढ झाले. युवराज संभाजी राजे, गागाभट्ट, मोरोपंत पिंगळे हे सिंहासनाच्या खालच्या पायरीवर आसनस्थ झाले. इतर सर्व आपल्या ठरलेल्या जागेवर उभे होते. मातोश्री जिजाबाईच्या समोर हा सोहळा चालु होता. महाराज सिंहासनावर बसताच वाद्यांचा गजर झाला. दुंदुभी झडल्या. रायगडावर तोफा गडगडल्या त्याचवेळी इतही गडांवर तोफा कडाडू लागल्या. नंतर महाराजांना १६ कुमारिकांनी सोन्याच्या ताटातून औक्षण

केले. गागाभट्टाने मोत्याचा तुरा लावलेला भरजरीस राजमुकुट महाराजांच्या मस्तकावर ठेविला व उच्च स्वरात शिवाजी महाराज हे छत्रसिंहासनाधिरवर व संस्कारयुक्तस राजे झाल्याचे घोषित केले.

यानंतर गागाभट्टाने व इतर ब्रम्हवृंदांनी महाराजांना समंत्रक आशिर्वाद दिल्यावर मोरोपंत यांनी महाराजांना मुजरा करुन ८००० होन सोन्याची नाणी महाराजांच्या मस्तकावर टाकली. त्यानंतर इंग्लीश, डच, पोर्तुगीज यांनी महाराजांना प्रणाम करुन नजराणे दिले. यानंतर महाराज अश्वारुढ होऊन गडावरील देवतांचे दर्शन घ्यावयास निघाले. नंतर सुवर्णालंकारानी सजलेल्या गजराजावर महाराज अरुढ झाले. त्याचे मालुत युद्ध सेनापती बीरराव होते. वाटेत त्यांच्यावर फुलांची वृष्टी केली. पंचारत्या झाल्या, महाराजांनी गडावरील देवतांचे दर्शन घेतले. नंतर राजभेत येऊन कुलदैवत, मोतुश्री यांना वंदन केले. यानंतर राज्याभिषेक सोहळा संपन्न झाला.

महाराजांनी या सोहळयास अपार दानधर्म केला. विद्वान, पंडीत, ब्राम्हण, संत, महंत, साधु इत्यादिना दान केले. गागाभट्टास सातहजार होन दक्षिणा दिली. हा दानधर्म १० ते १२ दिवस सतत चालु होता. सभासदाच्यास म्हणण्याप्रमाणे सर्व खर्च १ कोटी ६२ होन इतका होता. तर डच रेकॉर्ड प्रमाणे १ १/२ लाख होन इतका होता. सर जदुनाथ सरकारांच्यामते २० लाख होन खर्च असावा. राज्याभिषेकानंतर दहा बारा दिवसांनी मातुश्री जिजाबाई स्वर्गवासी झाल्या. (१८ जुन १६७४) आपला मुलगा सिंहासनाधिष्ठीत झाल्याचे, राजकर्ता झाल्याचे पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले. यानंतर २४ सप्टेंबर १६७४ रोजी महाराजांना पुन्हा एकदा राज्याभिषेक करुन घ्याव लागला.

**कु. जाधव अश्विनी**

**एफ.वाय.बी.ए.**

*****

## महाराणी ताराबाई



महाराणी ताराबाई (१६७५-१७६१) ह्या छत्रपती राजाराम महाराजांच्या दुसऱ्या पत्नी आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे सरसेनापती हबीराम मोहिते ह्यांच्या कन्या होत्या.

सरसेनापती हंबीराम मोहिते यांची ही कन्या मराठ्यांच्या इतिहासात सर्वाधिक कर्तबगार स्त्री बनली संभाजी राजे व राजाराम यांच्यानंतर मराठ्यांचे राज्य सांभाळून मोगलांना तोंड देणारी ही रणरागिणी महाराष्ट्रातल्या कर्तबगार व श्रेष्ठ सेनापतींपैकी एक होती संभाजी व राजाराम यांच्या पश्च्यात निर्माण झालेल्या गंभीर प्रसंगात मराठ्यांच्या राज्याचे नेतृत्व केले. सरदारस व मुत्सदयांच्या मदतीने मोगलांवर विजय मिळवल्या. उत्तरेतील मोगल प्रदेशावर हल्ले केले. करवीर राज्याची किंवा कोल्हापुरच्या गादीची त्यांनी स्थापना केली. अत्यंत बुद्धिमान, शुर व तटोपदार असलेलीस हि स्त्री घोडेस्वारी व युद्ध कौशल्यात निपूण होती, राजकारणाचाही तिचा उत्कृष्ठ अभ्यास होता. १७०० साली राजाराम मरण पावल्यावर १७०७ मध्ये औरंगजेब मरेपर्यंत मोगलांशी तिने झुंझ दिली. मराठ्यांचे राज्य संपवण्याचे औरंगजेबाचे स्वप्न धुळीला मिळवले. शिवाजी किंवा संभाजीपेक्षाही औरंगजेबाला तिच्या युद्धनिती व राजनितीमुळे अपयश मिळाले असे

म्हणावे लागेल. १७०५ मध्ये तिच्या काळातचं नर्मदा पार करुन मराठ्यांनी माळवा लुटला.

राजारामाशी ताराबाईचे लग्न १६८३-८४ च्या आसपास झाले आसपास झाले असावे. सोयराबाईने हंबीररावाची मुलगी म्हणूनस मुलाचे तिच्याशी लग्न केले. संभाजी पकडला गेल्यानंतर झालेल्या घडामोडींमध्ये ती सहभागी होती. रायगडाला वेढा घातल्या गेल्या नंतर ती राजारामाबरोबर पळून गेली. पुढे राजारामाबरोबरच जिंजीला राहिली. तेथेच ९ जुन १६९६ रोजी ताराबाईला शिवाजी हा पुत्र झाला. जिंजीहून राजारामाने चालवलेल्या राज्यात व राजकिय हालचालीत ती सक्रिय होती. जिंजीहून राजाराम पळाल्यानंतर ताराबाई जुल्फिकाखानाला सापडली परंतु लवकरच तिची मुक्तता झाली. दरम्यान राजाराम मेल्यानंतर पुत्र लहान असल्यामुळे ती राज्याची शासक बनली. औरंगजेबाला आता मराठ्याचे राज्य संपवू असे वाटू लागले परंतु यावेळी ताराबाईने मराठा राज्याची सुत्रे हाती घेतली. धनाजी जाधव, उदाजी चौहान, कानोजी खांबरे, रामचंद्रपंत अमात्य आदि सरदारांच्या मदतीने तिने मोगलांवर प्रचंड हल्ले सुरु केले. स्वतः ताराबाई युद्धनेतृत्व करत असे ती एक कुशल सेनापती होती. गनिमी काव्याचा वापर करुन मोगलांची रसद लुटणे, त्यांचे सैन्य नष्ट करणे, पावसाळ्यापुर्वी डोंगरी किल्ले मोगली सरदारांना लाच घेवून लुटणे व विकणे व नंतर पुन्हा जिंकून घेणे याचे तिने एक तंत्र निर्माण केले. औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत मराठ्यांना एकत्र ठेवले. मोगलांशी लढा तिने चालूच ठेवला. १७०७ मध्ये औरंगजेब मरण पावल्याने मराठ्यांच्या राज्याच्या विनाशाला तिने यशस्वीपणे टाळले तिच्या या योगदानाचे मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद घ्यावी लागली. निसंशय दुसऱ्या घराण्यातील ती सर्वाधिक कर्तबगार स्त्री होती. जगातील उत्कृष्ठ व श्रेष्ठ महिला सेनापतींमध्ये तिची गणना करावी लागेल. तिच्या योगदानाशिवाय शिवाजी संभाजींचे कार्य नष्ट झाले असते व महाराष्ट्र एक मोगली प्रदेश बनला असता.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर तिच्या व मराठ्यांच्या दुर्दैवाने मराठी राज्याचे नेतृत्व तिला करता आले नाही. जुल्फिकाखानाने मराठ्यांचा शक्तिपात व्हावा म्हणून व मराठ्यामध्ये दुहि निर्माण व्हावी म्हणून शाहूंची सुटका केली. यामुळे ताराबाई व शाहू यांच्यात १७०७ साली खेडकडूस येथे लढाई झाली त्यानंतर ताराबाईच्या कडक स्वभावामुळे आंग्रे, घोरपडे, थोरात इ. प्रमुख सेनापती शाहूंच्या पक्षात गेले. फक्त रामचंद्रपंत अमात्य एकटा ताराबाईच्या पक्षात शेवटपर्यंत उरला. नंतर बाळाजी विश्वनाथाने ताराबाईच्या पक्षात येऊन उर्वरित सरदार शाहूकडे नेले. पुढे १७१४ साली राजारामाची दुसरी पत्नी राजसबाई हिने तिला मुलगा दुसरा संभाजी याला कोल्हापुरच्या गादीवर बसवले. ताराबाई व तिचा पुत्र दुसरा शिवाजी याला कैद करण्यात आले. कैदेतच दुसरा शिवाजी मरण पावला व ताराबाई राजसत्तेपासुन दुर करण्यात आली. पुढेस झालेल्या वारणेच्या तहानंतर शाहू व कोल्हापुरच्या संस्थानात दिलजमाई झाली. मराठास राज्याचे नेतृत्व शाहूने करावे तर कोल्हापूर संस्थानाला मान्यता देऊन टिकवू दयावे हे शाहूने मान्य केले पुढे शाहूच्या मध्यस्थीनेचे ताराबाईची कैदेतून सुटका करण्यात आली व पुढील काळ ती साताऱ्यातच राहिली. ९ डिसेंबर १६६१ रोजी अजिंक्य तारा किल्ल्यावर तिचे निधन झाले. तिची समाधी शिख क्षेत्र माहूली येथे कृष्णेच्या काठावर आहे.

**कु. राणे गायत्री अनिल**

**एफ.वाय.बी.ए.**

*****

# छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक क्रांतीविषयी विचार



सामाजिक क्रांतिवाचून राजकीय स्वातंत्र्य मिळाले तर त्याचा लाभ समाजातील उच्चवर्णीय लोकांनाच होणार हे काळ्या दगडावरच्या रेघेइतके स्पष्ट असल्यामुळे शाहू महाराज सामाजिक परिवर्तनाच्या अनेक योजना जाणिवपूर्वक राबवत आले होते. सामाजिक क्रांतीची वाटचाल सर्वांगीण सामाजिक विषमतेचे उच्चाटन झाल्याखेरीज सुरुच होऊ शकणार नाही हे शाहू छत्रपतींनी पूरते ओळखले होते जन्मधिष्ठित श्रेष्ठकनिष्ठता ती वर्णव्यवस्थेने समाजजिवनात घटक रुजविली होती आणि धर्मसंस्थेने वर्चस्व करुन ठेवली होती. तिला सुरुंग लावण्याचा परोपरीने प्रयत्न त्यांनी त्यामुळेच केलेला दिसुन येतो.

यापैकी कशावरही शाहू महाराजांचा विश्वास नव्हता. सामाजिक क्रांतीखेरीज राजकीय किंवा आर्थिक क्रांती होऊच शकत नाही आणि झालीच तरी ती चिरस्थायी होऊन तिचे लाभ समाजातील सर्वांना सारखा प्रमाणात उपभोगता येतील हे तर मुळीच संभवत नाही. हे त्यांना ठाऊक होते. स्वातंत्र्यय कायमच संकटात असते. सर्व व्यक्तींचा दर्जा, हक्क, आणि संधी यांच्या समतेखेरिज स्थिर स्वातंत्र्य संभवतच नाही. या गृहित कृत्यावर शाहू महाराजांनी सर्व धोरणे आधारलेली होती.

**१) संरजाम शाहीची पाळेमुळे खणुन काढली -**

सर्वांना शिक्षण घेण्याची मुभा देणे, पेशवाईतील अनिष्ठ रुढिपायंडांना आळा घालणे आणि नोकरशाहीची आधूनिक चौकट निर्माण करुन सर्व लोक दृष्टिंनी समर्थ व्हावेत आणि त्यांनी आपल्या कारभाराची धूरा स्वतःच सांभाळाची हेच त्यांच्या मते आदर्श चित्र होते. मात्र ब्रिटीशांच्या तावडीतून देश स्वातंत्र्य करण्याचे राष्ट्रवाद्याचे मार्ग त्यांना दूरगामी पाहता येतो. त्यांच्यावर आधारित सरंजामशाहीवरच त्यांनी प्रहार केला त्या सरंजामशाहीचा आधार जर साम्राज्यशाहीला कायम मिळत राहीला असता. तर परकीय राज्यकर्ते, इतक्या लवकर या वेशातून गेलेच असते असे म्हटल्यास ते अतिशयोक्त होणार नाही.

**२) अस्पृश्योद्धाराची धोरणे आणि कार्य -**

भारतीय समाजातील सर्वाधिक उपेक्षित आणि वर्णव्यवस्थेचा चौकटी बाहेर दास गुलामांचे आयुष्य कंठणारा किंबहूना दास गुलांमापेक्षाही पशुकोटीतील जीवनमान वाढण्याला आलेला घटक म्हणून तथाकथीत अस्पृश्यांचा उल्लेख करता या आणि अशा अनेक व्यावहारिक गोष्टी धाकसीपणे अमलात आणून शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धाचा कार्यक्रमाला युगधर्माच्या योग्यतेस पोहोचले होते.

**३) जातिभेद निराकरण -**

जगामध्ये अन्यत्र कोठेही नसलेली जाति व्यवस्था आणि तदंतरीत जन्मसिद्ध उच्चनीचता हे भारतीय समाजाचे व्यवच्छेदक लक्षण होते. कर्मविपाक सिद्धांताने ती उच्च नीचता गतजन्माशी आणि ईश्वरी इच्छेशी जोडून टाकल्यामुळे सर्वानी तिचा निमुटपणे स्विकार केला होता. इंग्रजी रावटी सोबत लो बुद्धीप्रमाण्यवाद आणि व्यक्ति स्वातंत्र्यविचार या देशात आला त्यामुळे प्रथमच या व्यवस्थेतील अंगभुत

अन्यायाकडे सामाजिक चितकांचे लक्ष गेले आणि त्यातील तर्कदृष्टता ध्यानात आली.

**४) पुढाकार उच्चवर्णीयांनी घ्यायचा -**

जातिभेद निर्मुलनाची गरज आहे. हे एकदा मान्य केल्यावर दुसरा प्रश्न साहजिकच असा पडतो की या कामी पुढाकार कोणी घ्यायचा? आणि त्यांचे चटकन उत्तर असे की सर्वाधिक बळी पडले त्या हलके मानल्या गेलेल्यांनीच जातिभेद मोडण्याचा कामी अग्रेसर असावे? पण महाराज्यांचे मत निराळे होते. त्यांच्या मते या खालच्या मानल्या गेलेल्या लोकांनी त्या दृष्टिने कितीही प्रयत्न केले तरी त्यांचा उपयोग होणार नाही अन्यत फक्त त्यांनीच असे प्रयत्न सुरु ठेवले महर्षी शिंदे यांच्या शब्दांमुळे सांगायचे तर भेटी व्यवहारात नव्हे तर उघड उघड शेटी व बेटीव्यवहारातही शाहू महाराज स्वतः छाती ठोकून जितके तयार होते त्याहून जास्त तयार दुसरा कोणीही लोकनायक दिसला नाही.

**५) जातिपरिषदांचे स्वागतार्ह कार्य -**

प्रत्येक जातीने स्वतःच्या संघटना करुन त्यांच्याकरवी साहजिकच हिताचे उपक्रम करवून घेण्यास संख्येत वाढ होत असल्याची वस्तुस्थिती नोंदवून त्या महाराज म्हणतात "काही पर्यायापर्यंत जातिभेद व जात्यभिमान सुटत नाही.... ज्या समाजात आपण वाढतो त्या समाजाला अभिमान वाटला पाहिजेत. त्या समाजाच्या बाहेर एक मोठा फारच मोठा समाज आहे व त्याचीही सेवा आपण केली पाहिजे. याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. म्हणूनच जातीचा अभिमान अगदी मर्यादित असावा.... जात्यभिमान हा परिषदांनी जातिभेद, जातिमत्सर व जातिद्वेष तीव्र करण्याचा खटाटोप करता कामा नये असा इशाराही महाराजानी वारंवार दिला आहे.

**६) जातिभेदावर आंतरजातीय विवाहाचा तोडगा -**

जातिभेद नष्ट कसा करता येईल यासंबंधी शाहू महाराजांनी अनेक दिशांनी विचार केलेला दिसुन येतो. त्यालाच एक मार्ग भिन्न जाती मध्ये शरिरसंबंध विस्तृत प्रमाणावर निर्माण होणे हा त्यांना दिसत होता. रोटी व्यवहारास कितपत सहजपणे समाजमान्यता मिळण्याची शक्यता होती. तेवढी ती बेटी व्यवहाराबाबत नव्हती हे ते जाणून होते. त्यामुळेच त्यांनी या बाबतीत कायद्याचा जास्तीत जास्त वापर करुन घेण्याचा निर्णय घेतला त्या कायद्यानुसार संघर्ष पेटला होता.

**७) ब्राम्हण वर्चस्वाला शह -**

समाजातील भिन्न जातिंच्या दर्जामध्ये आणि अधिकारांमध्ये तफावत जेवढी जास्त असेल तेवढा तो समाण विघटीत राहाण्याची शक्यता मोठी असते हे ओळखून शाहू महाराजांनी आपल्या संस्थांनामध्ये काही बदल करण्याचे ठरवले. सर्वच सरकारी विभांगामध्ये विशेषतः शिक्षण विभागामध्ये ब्राम्हणवर्गाचा अधिक भला असल्यामुळे तिथे खोडसपणा करण्याची भरपूर संधी त्याला मिळते म्हणून त्या विभागाची आमुलाग्र फेररचना करणे छत्रपती शाहू अभत्याचे वाटत होते.

**८) कुलकर्णी वतने बंद केली -**

रयतेत विध्येचा प्रसार होऊ लागल्याने तिला जास्त हक्क देण्याची वेळ आली आहे. या जाणीवेतून शाहू महाराजांनी बिकानेर, त्रावणकार, वगैरे संस्थाप्रमाणे प्रजेला ग्रामपंचायत देण्याचा निर्णय घेतला आहे. हे त्यांच्या प्रत्ययास आले होते. अशा प्रकारे दलित, भटके-विमुक्त, अल्पसंख्यांक शुद्रादी बहूजनसमाज आणि स्त्रिया यांच्यावर पुत्रवत प्रेमाचा वर्षाव करुन पूत्रवियोगाचा दुखावर महाराजांनी मात केली.

**वाकसे काळू कोंडू**

**एस.वाय.बी.ए.**

*****

# पंचायतराज व्यवस्थेतील बदल आणि ग्रामीण विकासाचे राजकारण



स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने बहुपक्षीय संसदीय लोकशाही शासन पद्धती स्विकारली भारतीय गणराज्याचा कारभार संसदेमार्फत जर राज्यांचा कारभार विधीमंडळामार्फत चालविणारे प्रौढ मतदानाने निवडलेले प्रतिनिधी पाहतात. परंतू देशांची एकुण समाजरचना पाहता तेवढे पुरेसे नाही. या दोन संस्था सर्व लक्ष पुरवू शकत नाही. त्यामुळे पंचायत राज संस्था व नगरपालिकांची आवश्यकता अनुक्रमे ग्रामीण व शहरी भागात कार्यरत आहे. पंचायत राज संस्था व नगरपालिका यांना आपण स्थानिक स्वराज्या संस्था किंवा स्थानिक स्वशासन संस्था म्हणतो. पंचायत राज्य संस्था यांना भारतीय संविधानाने गणराज्य व राज्यशासन यानंतरस शासनाचा तिसरा स्तर म्हणून मान्यता दिली आहे ही व्यवस्था सार्वजनिकपणे सर्व देशभर लागू आहे. ग्रामीण विकासाची खरी जबाबदारी कार्यान्वित असलेल्या पंचायत राज व्यवस्थेतील यंत्रणेची आहे. संविधानाच्या ७३ व्या दुरूस्तीमुळे पंचायत राज संस्था म्हटल्या जाणाऱ्या प्रशासकीय एकाकाचे अर्थपूर्ण सक्ष्मीकरण व सबलीकरण झालेले आहे. महाराष्ट्राचे व देशाचे नेतृत्व करण्याची क्षमता आणि आकांक्षा असणाऱ्या या ग्रामीण महाराष्ट्रातील पंचायत राजसंस्था म्हणते. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीचा या खऱ्या अर्थाने संसदीय लोकशाही प्रशिक्षण शाळा ठरल्या आहेत गावाचा सरपंच हा राज्याचा मुख्यमंत्री होऊ शकते, देशांच्या मंत्री होतो. पंतप्रधान पदाची स्वप्ने पाहू शकतो केवळ राजकारण नव्हे तर देशांची विकासाची दिशा व धोरणे ठरविण्याची कामी या नेत्यांच्या शब्दांना मान आहे कारण पंचायत राज्य संस्थेने भक्कम केलेला त्यांच्या नेतृत्वाचा आणि निर्णय शक्तीचा खऱ्या आणि सुख दुःखाशी, आशा-आकांक्षाशी संबंध आल्यामुळे विस्तारलेली विचारांची क्षितिजे शासनाने १ मे १९६२ रोजी नविन पंचायत राज व्यवस्थेचा अंगिकार केला.

जिल्हा परिषदामार्फत राज्यपुरस्कृत योजना राबविल्या जातात. इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री सडक योजना, सुवर्ण जयंती ग्रामीण स्वंयरोजगार योजना, राष्ट्रीय बॉयगॅस विकास कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामविकास योजना इ. लोकांच्या विकासाला सहभाग वाढवावा. यासाठी यशवंत ग्राम समृद्धी योजना राज्य शासनाने आखली आहे. तसेच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाने तर खुपच प्रगती केली आहे. एवढेच नव्हे तर एकविसाव्या शतकातील जागतिक कॉपोरेट कल्चर व आधूनिक कार्य संस्कृति जिल्हा परिषदेत दुजावी म्हणून जिल्हा परिषदांना आय.एस.ओ. प्रमाणिक करणाचा उपक्रम ग्रामविकास विभागाने राबविला आहे. २००९ अखेर राज्यातील २५ जिल्हा परिषदांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळालेले आहे. तेथे ई-गर्व्हनन्स वाढविण्याचा निर्धार शासनाचे केलेला आहे. राज्यातील खेडी हगणदारी मुक्त करण्याचा उपक्रम राबवत केंद्र सरकारच्या निर्मलग्राम योजनेतही राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. २००८ डिसेंबर अखेर ६६६५ ग्रामपंचायती निर्मल झाल्या होत्या आणि २००९ अखेर १८८४ ग्रामपंचायतीसाठी त्यासाठी शिफारस संबंधीत समितीने केली आहे. दोन वर्षांत १७ हजार ग्रामपंचायत निर्मल करण्याचा कार्यक्रम शासनाने

आखला आहे. नव्या ग्रामविकास धोरणांचे वैशिष्ट्ये म्हणजे महिलांच्या व गरिब वर्गाचा रोजगार आणि स्वरोजगारासंबंधी पंचायती व ग्रामसभांना मिळालेले अधिकार राज्यात हजारोंच्या संख्येने बचतगट स्थापन करण्यास प्रोत्सहान देण्याबरोबरच ७ ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षणकडे सुरु करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे.

**७३ व्या घटना दुरुस्ती नंतरची व्यवस्था -**

इ.स. १९९३ मध्ये ७३ वी घटना दुरुस्ती झाली या घटना दुरुस्तीमुळे पुढील परिवर्तन दिसुन येतात.

**१) घटनात्मक दर्जा -** यास दुरुस्तीमुळे पंचायतराज व्यवस्थेस घटनात्मक दर्जा प्राप्त झाला यामुळे स्थानिक स्पशासनास भारतीय प्रशासनाचा तिसरा महत्त्वाचा स्तर म्हणून अधिकृत मान्यता मिळाली.

**२) ग्रामसभेला महत्व -** या दुरुस्तीमुळे ग्रामसभा निर्वाचीत सदस्यांवर नियंत्रण ठेवू शकत आहे. परिणामी ग्रामसभेला लोकसभेप्रमाणेच महत्व प्राप्त झाले.

**३) कार्यकालाची निश्चिती -** पंचायतराज संस्थेचा कार्यकालाची निश्चिती पुर्ण देशभर एकसमान झाली. एवढेच नव्हे तर ५ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यांचा आंत नविन निवडणूका होणे अपरिहार्य झाले आहे.

**४) लेखांकन व्यवस्था -** या दुरुस्तीमुळे राज्यसरकारांना ग्रामीण व शहरी संस्थाच्या लेखांकनाची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले गेले

**५) राज्यवित्त आयोग -** स्थानिक स्वशासन संस्थाना त्यांच्या कल्पन्नाच्या दृष्ट्रीने योग्य वाटा मिळावा म्हणून राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्याची तरतुद निश्चित करण्यात आली आहे.

**६) आरक्षण -** या घटना दुरुस्तीमुळे महिलांना ग्रामीण व शहरी स्थानिक स्वशासनामध्ये ३३ टक्के आरक्षण प्राप्त झाले. तसेच अनुसुचीत जाती व जमातीना लोकसंख्येला प्रमाणात आरक्षण प्राप्त झाले.

**७) निर्वाचन आयोगाची तरतुद -** स्थानिक स्वशासनातील ग्रामीण व शहरी संस्थाच्या निवडणूका स्वतंत्र्य व निष्पक्ष वातावरणात होत आहे.

- **सुधारणा -**

स्थानिक स्वशासनामध्ये बदलत्याकाळीनुसार काही सुधारणा होणे आवश्यक आहेत. त्यापुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) स्थानिक स्वशासनास अधिक प्रभावी बनविण्यासाठी त्या अंतर्गत माहिती व तंत्रज्ञानाचा विकास करावा आणि सर्व स्थानिक संस्थाचे Communication Network तयार करावे.

२) स्थानिक स्वशासनातील माहिती उपलब्ध करुन देणाज्या यंत्रणेस अधिक कार्यक्षम व प्रभावी बनविले गेले तर जनसहभाग वाढविण्यास मदत होईल.

३) स्थानिक स्तरांवर स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करावे अशी अवस्था ब्रिटनमध्ये व भारतातील केरळ राज्यात आहे.

४) स्थानिक प्रतिनिधी जरस कार्य करीत नसतील तर जनतेने त्यांना परत बोलवावे Recall अशी व्यवस्था मध्यप्रदेश या राज्यात आहे.

५) स्थानिक स्वशासन संस्थाना आपल्या विकास कार्यक्रमच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थानिक गैरसरकारी व स्वयंसेवी संस्थाचे सहकार्य घेतले पाहिजे.

जो पर्यंत स्थानिक संस्थाना अधिकाधिक स्वातंत्र्य दिले जाणारे नाही तोपर्यंत त्याचा योग्यमार्गने विकास होणार नाही. केवळ स्वातंत्र्यच नव्हे तर सर्व प्रकारचा वित्तीय मदतही करणे आवश्यक आहे. या संदर्भात लॉर्ड रिपचनचे मत आजही महत्वाचे वाटते ते म्हणजे "जो पर्यत स्थानिक स्वराज्य संस्थाना राज्य सरकारकडून अनुदानाच्या स्वरुपात पुरेसा पैसा दिला जात नाही. तो पर्यंत त्याच्याकडून विकास कार्यांची अपेक्षा करणे चुकीची आहे. त्यासाठी प्रत्येक राज्य सरकारने उदारपणे स्थानिक संस्थाना वित्तीय सहाय्य

दिले पाहिजे." विकेद्रीकरणाचे तत्त्व आणि विकास कार्याचा तपशील या दोन्ही बाबतीत आपल्या पंचायत राज संस्थानी भरीव योगदान दिले आहे व देशांतील लोकशाही बळकट करण्यास त्यांनी थेट हातभार लावला आहे.

**वसावे रविता किर्ता**

**एस.वाय.बी.ए.**

*****

## भारतातील समाजातील स्त्रियांची बदलती स्थिती



"पौराणातील आदि शक्ती तु प्रभुची नितांत भरनी तु. शिवभाची जिजाऊ तु राणी झाशीची बळकटबाहू तु सळसकट त्या मावळयाची जय भवानी तु राक्षसांना वधणारी काली माता तु प्रयत्नानां लाबलेली उन्नती तु आजच्या युगाची प्रगती तु."

भारतीय समाजामध्ये स्त्रियांच्या सामाजिक दर्जा संदर्भात कमालीचा विरोधाभास आढळतो. एका बाजुला प्रत्येक्षात ठोकाचे दुय्यम स्थान, शोषण असा हा विरोधाभास आहे. एका बाजूला "स्त्री प्रतिष्ठा हा समाजाच्या श्रेष्ठत्वाचा निकष व दुसज्या बाजूला सामाजिक स्तरीकरणामध्ये शेवटचे स्थान असा हा विरोधाभास आहे.

आज २१ शतकात स्त्रियांनी मोठ्याप्रमाणात प्रगती केली आहे. इ.स. पूर्वच्या काळात स्त्रियांची परिस्थीती हि अत्यंत हलाकीची होती. राजाराम मोहन रॉय व जोतीबा फुले यांनी स्त्रियांच्या अडचणी समजून त्यांना त्यातून बाहेर पडण्यासाठी मार्ग दाखवला महात्मा फुले यांनी स्वताःच्या बायकोला सावित्रीबाई फुले यांना शिकवून पुण्यात मुलीसाठी पहिली मुलीची शाळा काढली. यामुळे शिक्षणाचे महत्व मुलीना कळले. व त्यामुळे आज २१ व्या शतकात सुद्धा स्त्रियां या पुरुषाच्या बरोबरीने शिकवून मोठ-मोठ्या अधिकारी पदावर काम करताना दिसत आहेत. राजाराम मोहन रॉय यांनी विधवा पुर्णर विवाह याला पाठिंबा दिल्यामुळे आजचा काळात सुद्धा स्त्रियांचे पुर्ण विवाह होत आहे.

**धर्म आणि समाजातील महिलांचे स्थान -**

आपल्या समाजात महिलांना एक विशेष दर्जा प्राप्त आहे, त्यांची महानता दयाळुपणा, वात्सल्य, दायित्व, सहनशिलता इ. गुण कोणीच नाकारात नाही. सगळेच या सर्व गुणांचे भरभरुन कौतुक करतात. त्यांना माता भागिनी, देवी अशी अनेक अलंकारित संबोधने दिली जातात. वेळी असे त्यांचा जयजयकार देखील केला जातो. पुजा केली जाते. तरिही बहुतांशी महिला आजही आपल्या समाजात अपेक्षित जगणे जगत आहेत. त्यांना पुरुषांच्या जोडीचे अधिकार किंवा वागणुक मिळत नाही. हे असे का? याला जबाबदार कोण? हे प्रश्न आपण सर्वाणिच स्वताःला विचारणे फार आवश्यक आहे. कदाचित या प्रश्नातच त्यांच्या या अपेक्षित अवस्थेचे उत्तर घडण्याची शक्यता नाकारता येते नाही. हे प्रश्न केवळ महिलांसाठी नाही तर एक समाज म्हणून आपल्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. आपल्या समाजात देव आणि स्थान फार महत्वाचे आहे. बहुतेक सर्वच जन कोणताणी कोणता तरी अथवा धर्म मानता आणि त्यांच्याशी संबंधीत सर्व नियम पथ्य वगैरे पाळण्याचा शक्यतोर सर्व प्रयत्न करतात. आता यात त्यांना कितपत यश होते. हा वादाचा मुद्दा ठरवू शकेल. प्रत्येक धर्माने महिलांनी एक विशेष चौकनात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वच

धर्म आणि धर्माच्या वृढी परंपरांवरुन तरी असेच दिसुन येते. सर्वच धर्म आणि यांचे संस्थापक हे पुरुषच आहेत. म्हणून मला स्त्रियांवरुन एक कविता आठवते.

"स्त्री एक सर्व समावेशक
सागर है।
तुझ सेही जिन्दंगी का
हर कोना उजागर है।।
तुझमे भावना ओसे भी भंडार है।
खुदके लिये कुछ नही
लेकिन ओरो के लिये संसार है।।
तुझमे हि मिलता जिवन का आदार है।
तुमारे बिन ये जिवन में
सिर्फ अंधकार है।।"

पुरुषप्रधान समाज निर्माण करण्यात सर्वच धर्मानी मोलाचीस भूमिका बजावली आहे. कदाचित या सर्व नियमाची अथवा रुढीचीं त्या काळात गरज असेल ही शक्यता नाकारता येत नाही. पण काळ अनुसार रुढीचा आपण केला पाहिजे. अथवा त्यात आवश्यक बदल केले पाहिजे. होते पण तसे काही पाहिजे त्या प्रमाणात झालेले दिसत नाही. अजुनही स्त्रिला त्या चौकटीत बंदीस्त ठेवण्याच्या आटोकाट प्रयत्न केला जातो. पण अजुनही वेळ गेलेली नाही. यात बदल करणे हे सर्वस्वी आपल्या हाती आहे. आणि सुरुवात हि आपण आपल्या पासुनच सुरु केली पाहिजे.

जगभरात स्त्रियांनी आपली गुणवत्ता आणि सार्मथ्य विविध क्षेत्रात सिद्ध केले आहे. आपल्या अथक परिश्रमानी त्यांनी त्या पुरुषापेक्षा कोणत्या क्षेत्रात मागे नाही. हे त्यांनी वारंवांर सिद्ध करुन दाखवले आहे. इतके असुन ही जर अजुन आपल्या समाजात अजुनही स्त्रि आणि पुरुष असा भेदभाव करत असेल त्यांना समान वागणूक देत नसेल तर ही फार खेत जनक आणि शरमेची बाब आहे, यात बदल हा झालाच पाहिजे. स्त्रिला समान वागणूक आणि संधी देणे हे एक काळाची गरज आहे. आणि आपण ते करण्यात अपयशी ठरलो. तर येणारा काळ आणि पिढी आपल्याला जरूर दोषी ठरवेल.

आत्मसन्मानाची ज्योत
हाती घेवून
अडथळयानां लाथाडून
सदैव पुढे जात
सितेची उपेक्षी
तु दे आता धुडकावून
नको हतबलता त्या द्रौपदीची
विचार जात तू खडसावून
अबला तू सबली तु....
नको अडवूस स्वतःला
आता विशेषणात तु
झाशीच्या राणीची शक्ती तु
मिराबाईची शक्ती तु
वात्सल्याची सिंदुताई तु
घराघरातील मुक्ताई तु
ओठांवरची जनाई तु
बहिणाबाईच्या मनात तु
शांताबाईच्या ह्दयात तु
घे भरारी तु कल्पनेची
जगण्याच्या शर्यतीत धाव
स्फूर्ती घे त्या उषेची
स्पर्धेच्या संग्रामात टिकवण्यासाठी
शपथ तुला त्या रझियाची
अहिल्याबाईचं रुप तू
जिजामातेचं स्वरुप तू
तुझं... आईचं काळीज
घेऊन जाताना पडलेल्या
मुलांच्या वेदनेने हळहळणारी
माता तु मानवतेची जननी तू
पण रहा सदैव मानिनी तू

पन्नास साठ वर्षापूर्वी म्हणजे २ पिढ्यांमागे पर्यंत स्त्रि हि फक्त स्त्रि होती. तीला आपल्या कुंटुबातल्या आणि समाजाच्या स्थानाची स्वच्छता जाणीव असायची चुल आणि मुल यातच तिच जगण होत. घरातील तीचे दुय्यम स्थान मुळातच तीच अस्तीत्व दुय्यम मानलं जायाचं. मुलगा-मुलगी दोन्ही तीच्या पोटची तरी मुलगा पुरुष म्हणून जगणार आणि लेकिने बाई म्हणूनच जगायच अशी त्या वेळची मानसिकता होती. हा तीचा मुलगा स्त्रिला गृहीत धरायला, दुर्लक्षायला, विसरायलाही स्वाभाविकपणे शिकत असे त्यात आई आईचं मुलीच नात वेगळ असायच आईकडून जगण्याच बळ मिळवत, जगण्याला तोंड देत आईच्या कष्टांना आठवत हि लेक बल्या पहाटे जात्यावरच्या ओट्यावरुन आपले मत अलघडून सांगताना म्हणत असे....

बापानं दिल्या लेकी, जणु आंधळयाच्या हाती
धरली त्यांची काठी मायबाईच्या नावासाठी
बापानं दिल्या लेकी दुर मुलखात
मायच्या नावासाठी राबती चिखलात
सासरंच घर नांदुन केले गोड
माय ग बाई तुझ्या धिराची हाये जोड

**गवळे माधुरी दिलीप**
**टी.वाय.बी.ए.**

*****

## आरोग्याच्या चांगल्या सवयी

आरोग्य हे फक्त शारिरिक नसून मानसिकही असते. व्यक्तिचे आरोग्य हे खाण्यापिण्याच्या योग्य सवयींवर अवलंबून असते. खाण्यासाठी न जगता जगण्यासाठी खायला हव. काय खाव काय खाऊ नये यासंदर्भात ज्ञान प्रत्येक व्यक्तीला हवा. याकरिता संतुलित आहार घेण फार महत्वाच असत. संतुलित आहार म्हणजे ज्या आहारात जीवनसत्व, प्रथिन, प्रोटीन, क्षार योग्य प्रमाणात समाविष्ट असतील. यामुळे शरिराची योग्य वाढ व विकास होतो.



संतुलित आहार तीन भागात वर्गीकृत असतो. नाश्ता, दुपारचे जेवण व रात्रीचे जेवण शरिरात प्रोटीन अतिशय महत्वपूर्ण घटक आहे. शरिरातील सर्व रासायनिक अभिक्रीयांमध्ये प्रोटीन महत्वपूर्ण भूमिका बजावते. त्याचप्रमाणे उत्तकांची निर्मिती, पुर्ननिर्मीत्ती व सुधारणा करण्यातही प्रोटीन महत्वपूर्ण असते. त्याकरिता दैंनदिन आहारात प्रोटीनयुक्त पदार्थांचा सामावेश करण गरजेच असत. जीवनसत्व हे जीवनाचे सत्व समजले जाते. अ, ब, क, ड, सी हे जीवनसत्वाचे प्रामुख्याने प्रकार पडतात. जीवनसत्व 'अ' हे डोळे तेजस्वी राहण्यासाठी फार महत्वपूर्ण आहे. जीवनसत्व सी च्या अभावामुळे त्वचेसंबंधी रोग उद्‌भवतात. त्वचा तजेली व टवटवीत राहण्यासाठी 'सी' जीवनसत्व महत्वाचे असते. शरिरात 'के' जीवनसत्व फार महत्वाचे आहे. 'के' जीवनसत्व रक्त गोठण्याच्या रासायनिक प्रक्रीयेत महत्वपूर्ण योगदान करते. याच्या अभावामुळे जखमांतुन होणारा रक्तस्त्राव थांबत नाही. जीवनसत्वांनतर महत्वाचं आहे. प्रथिन, शरिरात ऊर्जेचा मुख्य स्त्रोत प्रथिने असतात. प्रथिन आपल्या मांसपेशीत साठवली जातात. यामुळे काम करताना लागणाऱ्या उर्जेचा पुरवठा प्रथिनातुन होतो. क्षार व लोह हे देखील फार महत्वपूर्ण आहे. या सर्वांचा सामावेश असणारा आहार संतुलित आहार मानला जातो.

सकाळचा नास्ता पोटभर करायला हवा यामुळे दैंनदिन कार्यात लागणाऱ्या उर्जेचा पुरवठा होतो. दुपारचे जेवण गरजेपुरत कराव आणि रात्रीचे जेवण कमी प्रमाणात कराव यामुळे पचनसंस्था अधिक कार्यक्षम राहून पचनक्षमता सुधारते. संतुलित आहार आरोग्यमय जीवन जगण्यासाठी फार महत्वपूर्ण आहे याचे अनेक फायदे आपणास पहायला मिळतात. संतुलित आहारामुळे वाढ व विकास योग्य दराने होतो. शारिरीक वाढ व मानसिक विकास पुर्णतः आहारावर अवलंबून असतो. आहारातून मिळणाऱ्या घटकांमुळे हाड मजबुत होतात, पेशी-उत्तकांचा विकास होतो, मांसपेशी विकसित होतात, मनाचा ताण-तणाव चिंता दुर होतात. कामात वक्रुगता वाढते यातून वाढ व विकास योग्य होण्यास मदत होते. संतुलित आहारामुळे कमीत कमी उजैचा वापर करुन न थकता काम करता येते. उजैचा मुख्य स्त्रोत प्रथिन व वसा असते. शारिरिक हालचाली व कार्याला लागणाज्या उजैचा पुरवठा आहारातून होतो. संतुलित आहारातून मिळणाऱ्या जीवनसत्वामुळे त्वचा तजेली व निरोगी राहण्यास मदत होते. त्वचेसंबंधी होणाऱ्या आजारांपासून बचाव होते.

शरिरात प्रथिन, जीवनसत्व, प्रोटीन, वसा, जार, लोह यांचे प्रमाण योग्य राहण्याकरिता योग्य आहार घेणे महत्वाचे ठरते. हिरवा पालेभाज्या, केशरी रंगाची फळ, बादाम, खजुर, दुध, अंडी सर्व प्रकारची धान्य व दाळी फळ, फळांचा ज्युस यांचा जास्तीत जास्तस वापर करावा. जास्तीत जास्त पाणी प्याव. याप्रमाणे आहारावर लक्ष दिल्यास आरोग्याकडे लक्ष देण्याची विशेष गरज पडत नाही.

**कु. वळवी प्रियंका खुमा**

**एस.वाय.बी.ए.**

*****

# खेळातुन शारिरीक क्षमतांचा विकास



खेळ हा मानवी जीवनासाठी अंत्यत उपयुक्त असतात. खेळामुळे व्यक्तीचा शारिरीक व मानसिक विकास होतो. खेळामुळे व्यक्तीचे शरिर शुद्ध व मन निरोगी राहते. खेळामुळे शरिर तंदुरुस्त राहते. व्यक्तीचा मानसिक विकास होण्यासाठी त्याचा शारिरीक विकास होणे महत्वाचे असते. स्वस्थ शरिरात स्वच्छ मन वास करते. काहींना खेळण आवडत नाही न खेळल्यामुळे अश्या व्यक्ती आळशी व टोकलकोंडे बनतात. खेळ खोळल्यामुळे व्यक्ती चुस्त, मनमोकळा बनतो. दैंनदिन जीवनातुन कमीत कमी अर्धा तास वेळ खेळण्यासाठी दिला गेला हवा. नियमीत खेळ खेळल्याने व्यक्तीची पाचनसंख्या मजबुत होते. शरिराची पाचनक्षमता मजबुत असेल तर व्यक्ती रोगांपासून दुर राहतो, त्याची रोग प्रतीकारक्षमता वाढते. धडांची मजबुती वाढते, त्वचा कांतीमय होते, श्वसनक्षमता उंचावते. यासारखे अनेक फायदे होतात.

व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासात शरिरबांधा हा प्रथमदर्शी घटक आहे. शरिरबांधा चांगला असणाज्या व्यक्तीचा इतरांवर फार प्रभाव पडतो. शरिर बांधणीचे महत्वपुर्ण काम खेळ करते. शरिरातील मांसपेशींचा धडांचा विकासही खेळामुळे होतो. कमीत कमी उजैत जास्तीत जास्त काम खेळामुळे करु शकतो. शरिरात उजैचा निर्माणन होतो म्हणून न थकता जास्त वेळ व्यक्ती काम करु शकतो. सर्वसाधारण व्यक्तीपेक्षा

खेळाडूमध्ये काम करण्यासाठीच्या शारिरीक क्षमता जास्त असतात खेळ फक्त शारिरीकच नाही तर मानसिक क्षमतांचा ही विकास करतो. खेळामुळे मन निरोगी होते. खेळामुळे निर्णयघेण्याची क्षमता, सहनशक्ती, अनुशासन, नेत्याच्या आज्ञेचे पालन यासारख्या क्षमतांचा विकास होतो. खेळामुळे व्यक्ती सकारात्मक शक्तीचा विकास होतो. कुठल्याही परिस्थितीकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होतो यामुळे खचुन न जाता लढण्याची ताकद निर्माण होते. प्रतिकुल परिस्थितीतही जगण्याची क्षमता निर्माण होते. खेळ खेळल्यामुळे व्यक्ती बर्हीमुखी बनतो. व्यक्तीसमाज व परिस्थितीशी अगदी सहन समन्वय राहाता येतो. खेळ खेळतांना खेळाडु धरुनही परत प्रयत्न करुन संघर्ष करुन जिंकण्याची जिद्ध ठेवून जिंकण्याचा प्रयत्न करतो. यामुळे पडून परत उभ राहण्याची क्षमता विकसित होते. मानसिक ताण-तणाव, आक्रमकता, चिंता यावर मात करता येते.

याप्रमाणे खेळातून शारिरीक तसेच मानसिक विकास होतो. यामुळे खेळण शरिरासाठीच नव्हे तर मनासाठीही फार महत्वाचे आहे. खेळामुळे मोठ्या प्रमाणात शारिरीक हालचाली होतात. यामुळे जास्तीत जास्त ऑक्सीजन आत घेतला जावून कार्बन डायऑक्साईड बाहेर फेकला जातो. यामुळे शरिरात कुठल्याही प्रकारचे विषारी वायुंचा प्रार्दुभाव होत नाही. शरिर स्वच्छ राहते. खेळात करण्यात येणाऱ्या शारिरीक हालचालींमुळे शरिरात ऑक्सीजन घेण्याची क्षमता वाढते. सर्वसाधारण व्यक्तीपेक्षा एका खेळाडुची ऑक्सीजन ग्रहण करण्याची क्षमता कई पटीने जास्त असते. शरिरात स्थुलता ही वडीपोज टिश्युमुळे वाढते. वडीपोज टिश्युंची संख्या वाढल्यामुळे शरिरात चरबीचे प्रमाण वाढते. स्थुलता ही आजकाल फार मोठ्या प्रमाणात भेडसवणारी समस्या आहे. खेळामुळे आपल्या आहारातुन घेतले जाणारे फॅट्स व कॅलरीज मोठ्या प्रमाणात बर्न होतात यामुळे शरिरात कोठेही त्यांचा अतिरीक्त साठा घेत नाही, व वडीपोज टिश्युंची संख्या मर्यादित राहल्यामुळे स्थुलताला सामोरे जावे लागत नाही.

**कु. वसावे रविता मांग्या**

**एस.वाय.बी.ए.**

*****

## संत गोरा कुंभार....
## (इ.स. १२६७ - १० एप्रिल १३१७)



हे महाराष्ट्रातील वारकरीस संप्रदायातील संत होते. ते नामदेव व ज्ञानेश्वरांचे समकालीन मानले जातात. गोरा कुंभार हे आध्यत्मिकदृष्ट्या संतपदाला पोहोचले होते, पंढरपूरच्या विठ्ठलाचे अनन्यसाधारण भक्त होते. गोराबा हे संत मंडळीमध्ये वयाने सर्वांहून वडील होते. त्यांना सर्व जण गोरोबाकाका म्हणत असत. त्यांचे गाव मराठवाड्यातील धाराशिव-उस्मानाबादजवळील तेर-ढोकी (या गावास सत्यपुरी किंवा तेरणा असेही म्हणतात) हे होय. गोरोबाकाका प्रापंचिक असूनही विरक्तच राहिले. त्यांचा पारमार्थिक अधिकार मोठा होता, पारमार्थिक क्षेत्रात त्यांचा शब्द प्रमाण मानला गेला.

प्रपंचात राहूनही त्यांनी पराकोटीचे वैराग्य अंगी बाणऊन घेतले. "न लिपींचे कर्मी, न लिपींचे धर्मी। नालिंपे षड्मुर्मी पुण्यापापा। म्हणे गोरा कुंभार सहजी जीवनमुक्त। सुखरुप अद्दवैत्त नामदेवा।।" असे त्यांनी एका अभंगात म्हटले आहे. एकदा मडकी बनवण्यासाठी माती भिजवून ती पायाने तुडवीत चिखल मळण्याचे त्यांचे नित्यकर्म चालत असे. श्री विठ्ठलाचे स्मरण सतत मुखात असे. त्यांना नामस्मरणापुढे कशाचेच भान उरत नसे. त्यांच्या भक्तिरसात बुडून जाण्याबाबतची पुढील कथा सांगितली जाते.

एकदा त्यांची पत्नी पाणी आणावयास म्हणून बाहेर गेली होती. तिने त्यांना आपल्या तान्ह्या बाळावर लक्ष ठेवण्यास सांगितले होते. गोरोबाकाका उन्मनी अवस्थेत गाडगी, मडकी घडविण्यासाठी लागणारी माती तुडवून चिखल करीत होते. त्यांचे ते तान्हे लेकरु चिखल करताना पायाखाली तुडविले गेले, तरी त्यांना भान नव्हते. पत्नी पाणी घेऊन आल्यावर पाहते, तर तिचे मूल गतप्राण झालेले होते. तिने हंबरडा फोडल्यावर गोरोबाकाका शुद्धीवर आले. तोपर्यंत वेळ निघून गेली होती. गोरोबांना वाटले आपण काय करुन बसलो. अतिशय मनस्वी पश्चातापात ते दग्ध झाले. पण काही काळानंतर विठ्ठलाच्या कृपेने त्यांचे मूल जिवंत झाले आणि त्यांच्या पत्नीस परत मिळाले. यानंतर त्यांची पत्नीही विठ्ठळभक्त झाली.

(या घटनेवर आपला विश्वास बसत नाही. पण गोरोबाकाकांचे कोणतेही लिखित चरित्र उपलब्ध नाही. २-३ प्रसंग मौखिक परंपरेतून चालत आले आहेत. या प्रसंगांवरुन त्यांच्या अमर्याद भक्तीची व त्यांच्या आध्यात्मिक अधिकाराची कल्पना आपल्याला येते एवढे निश्चित.)

संत गोरोबांकडे तेर-ढोकी येथे निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर महाराज, सोपानदेव, मुक्ताबाई, संत नामदेव, चोखामेळा, विसोबा खेचर आदि संतांचा मेळा जमला होता. याच प्रसंगी संत ज्ञानेश्वरांच्या विनंतीवरुन गोरोबाकाकांनी 'कोणाचे मडके (डोके) किती पक्के' अशी प्रत्येकाच्या डोक्यावर मारुन परीक्षा घेतली होती, असाही प्रसंग सांगितला जातो. संत गोरोबांची उपलब्ध काव्यरचना अत्यल्प आहे. त्यांचे सुमारे २० अभंग सकलसंत गाथेत समाविष्ट केले आहेत. त्यांची काही पदरचना धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिर येथील बाडात सापडते. गोरोबा हे साक्षात्कारी संत होते.

निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे। तव झालो प्रसंगी गुणातीत।।

अशा त्यांच्या अभंगांत अद्वैत साक्षात्काराचीच अनुभूती केवळ प्रकट झालेली दिसते. 'म्हणे गोरा कुंभार' ही त्यांची नाममुद्रा होय. संत ज्ञानेश्वरांनी प्रतिपादिलेला ज्ञानोत्तर भक्तीचा मार्ग संत गोरोबांनी स्वीकारलेला दिसतो. प्रपंच करत परमार्थ साधता येतो याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे संत गोरोबाकाका! त्यांची समाधी तेर गावी आहे. हे गाव सध्याच्या उस्मानाबाद जिल्ह्यात असून लातूरपासूनही जवळ आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेल्या उद्धवचिद्घनाने त्यांचे मराठीत ओवीबद्ध चरित्र लिहिले आहे. तेरढोकी येथे त्यांची समाधी असून तेथील त्यांचे घर, त्याचप्रमाणे मूल तुडविलेली जागा आजही लोक दाखवितात.

केशवाचें ध्यान धरुनि अंतरीं ।
मृत्तिके माझारीं नाचतसे ।।१।।
विठ्ठलाचें नाम स्मरे वेळोवेळ ।
नेत्रीं वाहे जळ सद्‌गसदीत ।।२।।
कुलालाचे वंशीं जन्मलें शरीर ।
तो गोरा कुंभार हरिभक्त ।।३।।

**कु. अहिरे मालती ब्रिजलाल**

**एस.वाय.बी.ए.**

*****

# संत सावता माळी...
## (जन्म इ.स. १२५०; समाधी इ.स. १२९५)




हे एक मराठी संतकवी होते. अरण; (तालुका-माढा; जिल्हा-सोलापुर) हे सावतोबांचे गाव होय. दैवू माळी हे सावता महाराजांचे आजोबा म्हणजे वडिलांचे वडील होत. ते पंढरीचे वारकरी होते. त्यांना दोन मुले होती. पुरसोबा आणि डोंगरोबा पुरसोबा हे धार्मिक वळणाचे होते. शेतीचा व्यवसाय सांभाळून ते भजन-पूजन करीत असत. पंढरीची वारी करीत असत. त्यांचा विवाहही त्याच पंचक्रोशीतील सदू माळी यांच्या मुलीशी झाला. या दांपत्याच्या पोटी सावतोबांचा जन्म झाला. या घराण्याचे मूळ गाव मिरज संस्थानातले औसे होय. दैवू माळी (आजोबा) अरण या गावी स्थायिक झाले. भेंड हे गाव जवळच दोन मैलांवर आहे. आपल्या जन्मस्थळाबद्दल सावता माळी म्हणतात -

धन्य ते अरण, रत्नांचीच खाण। जन्मला निधान सावता तो।।

सावता सागर, प्रेमाचा आगर। घेतला अवतार माळ्या घरी ।।

सावता माळी यांनी भेंड गावचे 'भानवसे रुपमाळी' हे घराणे असलेल्या जनाई नावाच्या मुलीशी लग्न केले. तिने उत्तम संसार केला. त्यांना विठ्ठल व नागाताई अशी दोन अपत्ये झाली. सावता माळी यांनी सेना न्हावी, नरहरी सोनार यांच्याप्रमाणेच त्यांनीही आपल्या व्यवसायातील वाक्प्रचार, शब्द अभंगात वापरले आहेत. तत्कालीन मराठी अभंगाच्या भाषेत नव्या शब्दांची, नव्या उपमानांची त्यामुळे भर पडली. सावता माळ्याचे अभंग काशीबा गुरव हा लिहून ठेवत असे.

सावता माळी यांच्या गावाजवळ पंढरपूर आहे, परंतु ते कधीही पंढरपूरला जात नसत. सावता यांना तेथील संतांच्या मांदियाळीत सामील होण्याची इच्छा झाली नाही. त्यांना वाटे, की ते जातीचे माळी आहेत. त्यामुळे त्यांनी मनापासून शेतीत-मातीत राबावे, पिकांची मशागत करावी, गाईगुरांना प्रेमाने सांभाळावे. शेतीला पाणी द्यावे, चांगले भरघोस पीक काढावे, अडल्या-नडल्यांना मदत करावी हीच खरी पांडुरंग भक्ती आहे अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे ते शेतीत रमत. ते शेती सोडून कुठेच कधी गेले नाहीत.

एके दिवशी, पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांची दिंडी त्यांच्या शेताजवळच्या रस्त्यावरुन चालली होती. सावता माळी यांनी त्यांच्या भजनांचा, टाळमृदंगाचा आवाज ऐकला आणि ते शेतातून बाहेर आले. त्यांनी त्या वारकऱ्यांनी पाणी, भाकरी, फळे, फुले देऊन पूजा केली. निघताना सावता यांनी त्यांच्या पायांवर डोके टेकवले व ते म्हणाले, "पंढरपूरला निघाला आहात. पांडुरंगाला माझाही नमस्कार सांगा." वारकरी चकित झाले. त्यांना वाटले, अरणभेंडी तर पंढरपूरच्या वाटेवरच, किती जवळ आहे, मग ते त्यांच्याबरोबर का येत नाहीत? त्यांनी त्यांच्या मनातील शंका सावता यांना विचारली. तेव्हा सावता माळी उद्गारले, "मी कसा येऊ? मी आलो तर देव माझ्यावर रुसेल. मला रागवेल." वारकऱ्यांनी विचारले, "का रागावेल?" त्यावर सावता माळी यांनी सांगितले, "अहो, माझा पांडुरंग या शेतात राहतो. या शेतात-मळ्यात राबणे, भाज्या फळे पिकवणे, वाटसरुला भाकरी देणे हीच माझी विठ्ठलभक्ती. हा मळा हेच माझे पंढरपूर! ही ज्वारीची ताटे म्हणजे माझ्या पांडुरंगाची कमरेवर हात

ठेवलेली जिवंत रुपे आहेत. ही सळसळणारी पाने, ही उडणारी पाखरे, हे झुळझुळ वाहणारे पाणी विठ्ठलभक्तीचीच तर गाणी सदासर्वदा गात आहेत. हे सर्व येथे, या मळ्यात आहे, तर मी पंढरपूरला येऊन काय करु?"

त्यांचे हे बोल ऐकून वारकरी खजील झाले. पांडुरंग केवळ मूर्तीत नाही तर आपण जे रोजचे काम करतो ते हसतमुखाने, मनापासून करण्यात पांडुरंगाची खरी भेट होते. असा संदेशच सावता माळी यांनी त्यांना दिला होता!

कांदा, मुळा, भाजी। अवघी विठाई माझी ।।

लसुण मिरची, कोथिंबिर। अवघा झाला माझा हर ।।

अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. संत सावता महाराज हे संत ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतले ज्येष्ठ संत होते. यांचा काळ इ.स. १२५० ते १२९५ चा आहे. (संत ज्ञानेश्वरांचा काळ इ.स. १२७५ ते १२९६ आहे.) 'साव' म्हणजे खरे तर शुद्ध चारित्र्य, सज्जनपणा सावता हा भाववाचक शब्द होय. सभ्यता, सावपणा असा याचा अर्थ होतो. सावता महाराज लहानपणापासून विठ्ठलभक्तीमध्ये रममाण झाले. फुले, फळे, भाज्या आदी पिके काढण्याचा त्यांचा पारंपरिक व्यवसाय होता. आमची माळियाची जात, शेत लावू बागाईत असे ते एका अभंगात म्हणतात.

स्वकर्मात व्हावे रत, मोक्ष मिळे हातो हात।'
'सावत्याने केला मळा। विठ्ठल देखियला डोळा।'

या ओळींतून त्यांची त्यांची जीवननिष्ठाय स्पष्ट होते. त्यांच्या अभंगांत नवरसांपैकी वत्सल, करुण, शांत, दास्यभक्ती हे रस आढळतात. सावतोबांची अभंगरचना रससिद्ध आहे.

सावता माळी यांचे अभंग कमी असले तरी त्याचा ठसा जनमानसावर उमटलेला दिसून येतो. काही अभंगातून त्याने तत्कालीन सामाजिक संदर्भाचेही दर्शन घडविले आहे. सावता माळी यांच्या अभंगात सोपेपणा, प्रासादिकता, व अल्पाक्षरत्व आढळते. सावताने आपले आध्यात्मिक अनुभव प्रकट करताना व्यवसायनिष्ट प्रतिमांचा वापर केला आहे.

सावता महाराजांनी पांडुरंगाला लपवण्यासाठी खुरप्याने आपली छाती फाडून बालमूर्ती ईश्वरालान हृदयात दडवून ठेवून वर उपरणे बांधून ते भजन करीत राहिले. पुढे संत ज्ञानेश्वर, नामदेव पांडुरंगाच्या शोधात सावता महाराजांकडे आले, तेव्हा त्यांच्या प्रार्थनेमुळे पांडुरंग सावतोबांच्या छातीतून निघाले. ज्ञानेश्वर, नामदेव पांडुरंगाच्या दर्शनाने धन्य झाले. सावता महाराज - भक्तीमध्येच खरे सुख नि आनंद आहे. तीच विश्रांती आहे. न लगे सायास, न पडे संकट, नामे सोपी वाट वैकुंठाची असा त्यांचा अनुभव होता. अरण येथे आषाढ वद्य चतुर्दशी, शके १२१७ (दि. १२ जुलै, १२९५) रोजी संत सावता महाराज विलीन झाले.

माळियाचे वंशी, सांवता जन्मला । पावन तो केला। वंश त्याचा।।

त्याजसवें हरी, खुरपूं लागे अंगी । धांवूनि त्याच्यामागे। काम करी ।।

पीतांबर कास, खोवोनी माघारी । सर्व काम करी । निज अंगे।।

एका जनार्दनीं, सांवता तो धन्य । तयाचें महिमान । न कळे कांही ।

सांवता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा ।

जेणे मुक्ती द्वारा ओळंगती।।

**वसावे अजय रुबजी**

**एस.वाय.बी.ए.**

*****

# सायबर युद्ध किंवा संगणक युद्ध किंवा माहिती तंत्रज्ञान युद्ध



आजचे युग माहिती व तंत्रज्ञानांचे युग आहे अशा या युगामध्ये संगणक, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर माहिती मिळविण्यासाठी व माहितीचे आदान-प्रदान करण्यासाठी होतो. आधुनिक युद्ध पद्धतीतील अत्याधुनिक युद्ध प्रकार म्हणजे सायबर युद्ध किंवा संगणक युद्ध होय.

सायबर किंवा संगणक युद्धांचे वेगवेगळे अर्थ सांगितले जातात परंतु सगळ्यांचा आशय संगणकाच्या शत्रुविरोधात संगणक च्या वापराशी आहे. सायबर युद्धाचे काही अर्थ पुढीलप्रमाणे साधनांच्या माध्यमातुन हल्ला चढविणे म्हणजे सायबर किंवा संगणक युद्ध होय.

सायबर किंवा संगणक युद्धांचे वेगवेगळे अर्थ सांगितले जातात काही अर्थ पुढील प्रमाणे - शत्रु सैन्य किंवा कारखान्याविरोधात शत्रुच्या माहिती तंत्रज्ञान व्यवस्थेवर संगणक व इतर साधनांच्या माध्यमातून अडथळे निर्माण करते.

अमेरिकी शासनाचे सुरक्षातज्ञ रिचर्ड कलार्क यांनी त्याचा २०१० मध्ये प्रकाशित सायबर वॉर या पुस्तकात सायबर युद्धांची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. इतर राष्ट्रांच्या संगणकीय यंत्रणा किंवा माहिती यंत्रणा नष्ट करण्यासाठी किंवा तीत अडथळे निर्माण करण्यासाठी एखाद्या राष्ट्राने केलेली कार्यवाही म्हणजे सायबर किंवा संगणक युद्ध होय. काहींच्या मते, सायबर युद्ध म्हणजे राजकीय हेतुने शत्रुच्या माहिती यंत्रणेवर किंवा व्यवस्थेवर इंटरनेटच्या माध्यमातून केलेला हल्ला होय.

आजच्या संगणकीय आधुनिक युगात माहिती व तंत्रज्ञानाचे जाळे इंटरनेटच्या माध्यमातून संपुर्ण जगतामध्ये व्यापले आहे. आधुनिक जगातील बहुतेक राष्ट्रे आपल्या महत्त्वाच्या माहितीचें अदान-प्रदान संगणकाच्या माध्यमातून करीत असतात व याच माहितीस साधनांवर किंवा नेटवर्कवर हल्ला झाल्यास शत्रू राष्ट्राच्या ताब्यात जाऊ शकते किंवा ती माहिती नष्ट झाल्यास राष्ट्राचे अपरिमित नुकसान होते. यासाठीच दहशतवादी युद्धखोर राष्ट्र आपल्या विरोधकांविरुद्ध संगणक किंवा सायबर युद्धाची आघाडी उघडतात. सायबर युद्ध हा राजकीय हेतुनी शत्रु राष्ट्राचा नेटवर्कवर संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून केलेला हल्ला असतो. याची काही प्रमुख उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे असतात.

१) शत्रु राष्ट्राची माहिती मिळविणे.
२) शत्रु राष्ट्राविरुद्ध हेरगिरी करणे.
३) शत्रु राष्ट्राच्या सुरक्षा यंत्रणेस भगंदाड पाडणे.
४) शत्रु राष्ट्राविरुद्ध घातपाती कारवाया करणे.
५) शत्रु राष्ट्राचा माहिती व तंत्रज्ञान व्यवस्थेस अडथळे निर्माण करणे किंवा नष्ट करणे.

अशी काही प्रमुख उद्दिष्ट्ये सायबर किंवा संगणक युद्धाची असतात. सायबर किंवा संगणकीय हल्ला करण्यासाठी पुढील काही पद्धतींचा वापर केला जातो. ऑनलाईन हेरगिरी किंवा इंटरनेटच्या वापराने हेरगिरी आणि सुरक्षेचे भदगाड किंवा सुरक्षा भेदणे. यामध्ये इंटरनेटच्या माध्यमातून शत्रू राष्ट्राची अत्यावश्यक माहिती मिळवणे म्हणजे हेरगिरी करणे व प्राप्त माहितीच्या आधारे इंटरनेटच्या वापराने शत्रु राष्ट्रांचा सुरक्षा यंत्रणेने अडथळे निर्माण करणे व सुरक्षा व्यवस्था भगदाड पाडणे ही उद्दिष्ट्ये प्रामुख्याने असतात.

**घातपात** - इंटरनेटच्या वापराने एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रांचा ऑनलाईन संदेश वहन यंत्रणेमध्ये अडथळे निर्माण करते. यामध्ये प्रामुख्याने सैनिकी संदेशवहनात अडथळे निर्माण केले जातात हा प्रमुख उद्देश असतो.

या प्रमुख प्रकारांसोबतच पुढील काही पद्धतींनी शत्रू राष्ट्रावर सायबर किंवा संगणक हल्ले केले जातात.

**अ) भौतिक आक्रमण -** संगणकाच्या पायाभूत घटकांना बॉम्ब विस्फोट आग इत्यादी माध्यमातून नष्ट करणे हे उद्दिष्ट असतो.

**ब) कृत्रिम आक्रमण -** यामध्ये संगणकातील पायाभूत घटकांना एखाद्या सॉफ्टवेअर किंवा व्हायरसच्या माध्यमातून इजा पोहोचविणे ज्यामुळे संगणकातील माहितीमध्ये अनिश्चितता निर्माण होते किंवा यंत्रणेस सुरु होण्यास उशीर लागतो.

**क) शब्दच्छल आक्रमण -** यामध्ये संगणक वापरणाऱ्यास माहिती न पडू देता त्याच्या संगणकीय माहितीमध्ये छेडछाड केला जातो. त्यामुळे वापरणाऱ्यास प्रत्येक वेळी नवनवीन अडथळयांना सामोरे जावे लागते.

**अ) हॅकिंग -** यामध्ये महत्त्वाची माहिती इंटरनेटच्या माध्यमातून मिळविली जाते. शत्रू राष्ट्राच्या माहितीचे गुप्त संकेत मिळवून त्यास फेरफार केली जाते.

**ब) ट्रोजन -** यामध्ये शत्रू राष्ट्राचा संगणकीय व्यवस्थामध्ये असे बदल केले जातात की ज्यामुळे संगणक कार्यक्रम बदलतात. म्हणजे त्यात संगणकात एक माहिती विचारल्यास दुसरीच माहिती मिळते.

**क) संगणक विषाणू किंवा संगणक व्हायरस -** यामुळे संगणक कार्यक्रम बाधित होतात व हे विषाणू तीव्रतेने अनेक संगणकामध्ये इंटरनेटच्या माध्यमातून पसरतात. अशा प्रकारचा सायबर हल्लाच्या संकल्पनेची प्रमुख उद्दिष्ट्ये शत्रू राष्ट्राची माहिती व तंत्रज्ञान व्यवस्था पुर्णपणे नष्ट करणे ही असतात.

**संदिप मोतीराम भिल**

**एस.वाय.बी.ए. (संरक्षण आणि सामरिक शास्त्र)**

*****

# १९६२ चे भारत - चीन सीमा युद्ध



भारत-चीन सीमायुद्ध हे १९६२ ला झाले. चीनने २१-११-६२ रोजी एकतर्फी शस्त्रसंधी जाहीर करुन अरुणाचल प्रदेश तत्कालीन नेफामधून फौजामागे घेण्याची घोषणा केली.

या सीमा युद्धाचा एक परिणाम आजही जाणवणारा म्हणजे चीनसंबधी सर्वसाधारण भारतीयांच्या मनात ठसलेला एक न्युनगंड पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात जगाच्या कुठल्याही राष्ट्राच्या तोडीस तोड अशा धैर्याने, कुशलतेने व शस्त्र वापरातल्या कसबाने लढलेली भारतीय सेना (भू सेना - १९६२ मध्ये, नौसेनेचा संबंध नव्हता व वायुसेनेला विचारात घेतलेच गेले नाही.) अशी एकाएकी हतबल का झाली. लढायांमध्ये जय - पराजय होतात, कितीही तयारी असली तरी प्रसंगाला तोंड फुटताच सर्व नियोजन ढासळु शकते, याची असंख्य उदाहरणे युद्ध इतिहासात आहेत. तस काही झाले का? पुढचा प्रश्न म्हणजे या १९६२ च्या युद्धापासून राष्ट्र म्हणून आम्ही काही शिकलो का?

उपलब्ध राजकीय प्रणालीमध्ये लोकशाही ही जास्त चांगली व्यवस्था आहे. यावर कदाचित एकमत होणार नाही पण फार मोठे विरोधी मत नसेल. अशा प्रजाप्रभुत्व व्यवस्थेतच लोकनियुक्त जनप्रतिनिधीकडे राहणार ते उघड आहे. ब्रिटिश पद्धती संसदीय असो वा अध्यक्षीय लोकशाही पद्धतीत नागरी सत्तेची सर्वोच्चता हा वादापलीकडचा मुद्दा आहे. अर्थात ही सत्ता निरंकुश

असली तर घातक, निर्णय घेवू शकते. त्यामुळे 'युद्ध', 'संरक्षण' यात नागरी सत्तेची सर्वोच्चता यावर चेक्स ॲण्ड बॅलेन्स असणे आवश्यक आहे. असे अकुंश काही प्रमाणात नियम कायदे-व्यवस्था प्रणाली यातून तर काही अशी अलिखित संकेत निर्माण करुन ते उजवून अस्तित्वात आणावे लागतात. हे एका रात्रीत होत नाही, हे खरे आहे. मात्र स्वातंत्र्यानंतर निदान नीट सुरुवात तरी आपण केली का हा प्रश्न '१९६२०' च्या संदर्भात विचारावा लागतो.

एखाद्या प्रसंगी युद्ध जाहीर करणे किंवा टाळणे, युद्ध होणारच अशी परिस्थिती निर्माण झाली तर राष्ट्राचे युद्ध उद्दिष्ट काय हे ठरविणे आणि राष्ट्राची सर्व शक्ती सैन्यदलांमागे उभी करणे, त्यासाठी गरज असेल त्याप्रमाणे परराष्ट्र धोरणे राबविणे. प्रसंगी आघाडी करणे, थाली बुद्धनियोजन म्हणतात. १९६२ प्रसंगी भारताकडे संरक्षण धोरण नाही आणि परिणामी युद्धाचे नियोजन शक्यच नाही. अशी परिस्थिती जाणवतेस युद्ध नको कारण आम्ही कुणावरच आक्रमण करणार नाही हे ठीक पण इतर राष्ट्राची हीच मानसिकता असेल याची खात्री काय?

भारत स्वतंत्र झाला तो फाळणी होऊन १५ ऑगस्ट १९४७ ला त्या आधीचा काळ हा लढ्याचा आहे. या लढ्यांमधुनच सत्ता हातात घेणारे नेतृत्व साकार होत असते. ज्याप्रमाणे लढा सुरु असताना आर्थिक, सामाजिक कायदे, औद्योगिकीकरण, परराष्ट्र संबंध या व अशा प्रश्नांवर माहिती, विचार, अभ्यास अशावर आधारुन भूमिका ठरत होत्या, मांडल्या जात होत्या त्या धर्तीवर 'संरक्षण' या क्षेत्राबद्दल काँग्रेसने काही अभ्यास करणे व त्यासाठी काही गट तयार करणे, इकडे लक्ष दिलेले दिसत नाही याबद्दल एकच उदाहरण पुरेसे आहे.

दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटले १ सप्टेंबर १९३९ रोजी सुरुवातीचा बराच काळ हे युद्ध युरोपकेंद्री होते. २२ जुन, १९४९ रोजी जर्मनीने रशियावर हल्ला केला. रशियन साम्राज्य (काहींना शब्दयोजना खटकेल; पण ते साम्राज्यात होते हे पुढे सिद्धही झाले.) युरोप - आशिया दोन्ही खंडात पसरलेले. त्यामुळे काही प्रमाणात आशिया युद्धात ओढला गेला; मात्र ७ डिसेंबर १९४९ रोजी जपानने हवाई बेटांमधल्या पर्ल हार्बर या मोठ्या व प्रशांत महासागराच्या मध्यभागी वसविलेल्या तळावर एकाएकी हल्ला केला. मागोमाग फिलिपिन्स, ईस्ट इंडिया (आजचा इंडोनेशिया) मलाया, सिंगापूर, ब्रम्हदेश असे आशियातले महत्त्वाचे प्रदेश ताब्यात घेतले. कोरिया चीनचा सागरी किनारा, फार्मोसा (आजचा तैवान) त्या आधीच जपानने जिंकले होते. ज्यात मचुरियाचाही समावेश होता. या पहिल्या धडकेत इतके यश मिळाल्याने जपानचे पुढचा लढा भारत, श्रीलंका व ऑस्ट्रेलिया असणार असा अंदाज बांधणे रास्त होते.

**कु. हिरे दिपाली संतोष**

**एस.वाय.बी.ए. (संरक्षण आणि सामरिक शास्त्र)**

*****

## खेळ व जीवन

आई माझा होमवर्क झालाय आता जाऊ का खेळायला? पुर्वी असे संवाद घरोघरी ऐकू यायचे आणि आता? ते टॅब ठेव आता बाजुला आणि ट्युशनला जा, असे संवाद ऐकू येतात. आता अशी मुले सुदृढ कशी बनतील? प्रत्येक गोष्टीसाठी मॅजिक औषध नसते. मुलं खेळात चांगले असेल तर त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढेल. खेळणे व शिकणे यात काहीच फरक नसतो. याकरीता पालकांनीही काळजी घ्यायला हवी. नर्सरीमध्ये मुलांना खेळण्यासाठी प्रोत्साहन करायला हवे. यामुळे त्यांचा शारीरिक व मानसिक विकास होण्यात मदत होते. मोठ्या मुलांसाठी

खेळणे म्हणजे अधिकची उर्जा मिळवण्याचे चांगले माध्यम आहे. खेळांमधून मुले नानाविध प्रकारची कौशल्ये शिकतात. सर्वात म्हणजे हरणे किंवा जिंकणे शिकतात. पराजय पचवणं शिकतात. हार-जित यातला फरक कळू लागतो. हार-जितचा अर्थ कळणे हे आयुष्याच्या अनेक टप्प्यात उपयोगी पडते. खेळण्यामुळे मुलांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होते. शारीरिक, मानसिक आणि भावनिकदृष्ट्या मुले सक्षम होतात. सांघिक खेळ मुलांना समुहाने काम करण्याचा धडाच देतात. एकमेकांशी संवाद साधायला आणि एकमेकांमधील मतभेद दूर करण्याला खेळ शिकवतात. खेळणे म्हणजे मुलांना गुंतवून ठेवण्याचे केवळ माध्यम पालकांना वाटते. त्यामुळे जसजसा अभ्यास वाढतो तसतसे पालकांना मुलांचे खेळणे म्हणजे वेळ वाया घालवणे वाटते. हा पूर्णतः चुकीचा विचार आहे. मुलांना खेळू द्यायला हवे. खेळण्याकरीता वेळ काढायला हवे. खेळामुळे आरोग्य सुधारते. आरोग्य हे सर्वात आधी, याची पालकांनी खुणगाठच बांधायला हवी.



खेळांमुळे अनेक फायदे होतात.

१) मुलांचे वजन प्रमाणापेक्षा जास्त वाढत नाही.

२) स्नायु व हाडे मजबुत होतात.

३) रोग प्रतिकारशक्ती वाढते.

४) मधुमेह होण्याची शक्यता कमी होते.

५) रक्तदाबावर नियंत्रण राहते.

६) चांगल्या कॉलेस्टॅरॉलमध्ये वृद्धी होते.

७) अनेक प्रकारच्या कॅन्सरपासून मुक्ती मिळते.

८) व्यक्ती प्रसन्न राहते.

९) आत्मविश्वास वाढतो.

१०) चांगली झोप येते.

शारीरिक व भावनिक आव्हानांना आणि मानसिक ताणतणावांना चांगल्या प्रकारे सामोरे जाता येते. जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन तयार होतो.

आज ज्या पद्धतीने लाईफ स्टाईल विकसित झालीय, ती बघता वरील बाबींची किती तीव्र गरज आहे, हे लक्षात येईल. मुलांनी दररोज किमान एक तास तरी मैदानावर खेळायला हवे.

व्यायामात लाभते स्वास्थ्य, दिर्घायुल्यं बलं सुखम्

आरोग्य परमं, भाग्यं, खाप्यं सर्वार्थमाधनमु

**कु. वसावे रविता मांग्या**

**प्रथम वर्ष कला**

*****






**राष्ट्रीय चर्चासत्र**

राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन करतांना मान्यवर.




राष्ट्रीय चर्चासत्राचे प्रास्ताविक मांडतांना मा.प्राचार्य डॉ. अशोक. पी. खैरनार.




राष्ट्रीय चर्चासत्रात मार्गदर्शन करतांना बाबासो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह



नॅक मूल्यांकन विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. धर्माधिकारी नागनाथ



राष्ट्रीय चर्चासत्राच्या प्रथम सत्रात मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. डी.एल. तोरवणे.



राष्ट्रीय चर्चासत्रात प्राचार्य राजेंद्र अहिरे, एस.जी. पाटील महाविद्यालय, साक्री यांचे मार्गदर्शन.




राष्ट्रीय चर्चासत्राचे सुत्रसंचालन करतांना प्रा. आतिष मेश्राम.




सॉफ्ट स्कील कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना मा.तेजस बेलदार.




संप्रेषण कौशल्यावर उद्‌बोधन करतांना प्रा. निष्ठा देव.



कौशल्य विकास कार्यशाळेत उपस्थित विद्यार्थी.



युवती व्यक्तीमत्व विकास चर्चासत्रात विद्यार्थ्यांना संबोधित करतांना डॉ. वैशाली देवरे.




युवती व्यक्तीमत्व विकास चर्चासत्राच्या पेपर सादरीकरण सत्रात महिलांचे अधिकार या विषयावर शोध निबंध सादर करतांना कु. भारती सैंदाणे.




मतदानाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन करतांना मा. तहसिलदार सो. श्री. संदिप भोसले.



नुतन मतदाता कु. ज्योती बाविस्कर हिस मतदार कार्ड बहाल करतांना मा.तहसिलदार सो. श्री. संदिप भोसले.




रा.से.यो.चे मानवी जीवनातील महत्व या विषयावर बोलतांना डॉ. सचिन नांद्रे.




रा.से.यो. विभागातर्फे लेक वाचवा, लेक शिकवा जनजागृती रॅली.



रा.से.यो. विभागातर्फे लेक वाचवा, लेक शिकवा या विषयावर रांगोळी प्रदर्शन.



स्वयंसिद्धा अंतर्गत कराटे प्रशिक्षण घेतांना विद्यार्थीनी.

# युग-पुरुष गुरुनानकदेव



हमारा देश भारतवर्ष पुरातन काल से ही बडे-बडे ऋषि मुनियों तथा महापुरुषों की भूमि रहा है। जिन्होंने सदा भाई चारे तथा एकता का सन्देश दिया है। ऐसे ही एक महापुरुष श्री नानक देव जी हुए जिनका जन्म पूर्णिमा के शुभ दिन संवत् १५२६ (सन १४६९ ई) में तलवंडी नामक गांव में, जो कि अब दक्षिणी पाकिस्तान में है, हुआ था। पूर्णिमा के चन्द्रमा की भांति उन्होंने जन मानस के हृदयों को ईश्वरीय-प्रेम से प्रज्ज्वलित किया। उस पुण्यात्मा के सौभाग्य शाली माता-पिता तथा श्री कालू मेहता थे। गुरु नानक देव जी सिक्खों के पहले गुरु थे तथा उन्होंने सिक्ख धर्म की नींव रखी।

बचपन में ही उनकी जन्म कुण्डली देख कर ज्योतिषी हरदयाल आश्चर्य चकित रह गए थे तथा उन्होंने भविष्यवाणी की थी कि यह बालक बडा होकर एक महान संत बनेगा। इसकी यशकीर्ति दूर-दूर तक फैलेगी तथा सारा संसार इसके चरणों में सिर झुकाएगा। हिन्दू-मुसलमान दोनों इसका आदर करेंगे ।

नानक बचपन से ही साधुओं की तरह बैठते। उन्ही की तरह बातें करते तथा जो पैसे मिलते दीन-दुखियों में बांट देते। खेल-कूद के बजाय उन्हें अपने नन्हे मित्रों के साथ भगवत्भक्ति के गीत मधुर-स्वर में गाना ज्यादा अच्छा लगता था।

सात आठ वर्ष की अवस्था में उन्हे स्कूल भेजा गया तथा वे अत्यन्त मेधावी छात्र साबित हुए। शीघ्र ही उन्होने वह सब सीख लिया, जो विद्या दान उनके गुरु जन उन्हें देने में समर्थ थे। उनकी विद्वता देख कर शिक्षक भी दंग रह गए। जब नानक कुछ और बडे हुए तो उनके पिता ने उन्हें खेती की देख भाल करने को कहा, परन्तु इस काम में उनका मन न लगा। उसके बाद उन्हें नौकरी करने तथा दूकान खोलने को कहा गया, लेकिन इन कामों में भी उनकी रुचि न हुई। पिता ने समझा शायद बालक विक्षिप्त हो गया है। उन्होने वैद्य को बुलाया। वैद्य ने नाडी देखनी चाही तो उन्होंने झट अपना हाथ खीच लिया और कहा -

"वैद बुलाया वैदगी, पकड टटोले बाँह
भोला वैद न जानई, दर्द कलेजे माँह
जाहु वैद घर आपने, मेरी थाह न ले
हम स्ते शाह आपने, तू किस दारु दे।"

धीरे-धीरे नानक की धार्मिक प्रवृत्ति बढती गई। एक बार पिता ने कुछ रुपये देकर उन्हें कहा कि बेटा जाओ और कोई ऐसा काम करो जिससे लाभ हो। मार्ग में जाते हुए उन्होंने  देखा कि साधुओं की एक टोली भूखी पडी है। उन्होंने सोचा इससे लाभदायक काम और क्या होगा कि भूखे को भोजन दिया जाए। अतः सारा पैसा उन्होंने उसी में खर्च कर दिया। घर आने पर पिता ने काफी डांटा-फटकारा तथा सोचा शायद विवाह के बन्धन में बाँधने से कुछ लाभ हो। अतः संवत १५५४ में सुलक्षिणी नामक सुशील व सुन्दर कन्या से उनका विवाह कर दिया गया लेकिन घर गृहस्थी भी उन्हे सांसारिक मोह-बन्धन में न बाँध सकी।

कुछ समय पश्चात् उन्होंने घर बार छोड दिया तथा धूम-धूम कर लोगों को उपदेश देने लगे। अब तक मरदाना तथा बाला नामक उनके दो शिष्य भी बन गए थे। वे कहते ईश्वर एक है। हिन्दू मुसलमान एक ही ईश्वर की संतान है। अच्छे काम करो जिससे ईश्वर के दरबार में तुम्हें लज्जित न होना पडे।

हिन्दू कहा न मारिये, मुसलमान भी ना
पांच तत्त का पुतला, नानक मेरा नाम!

धीरे-धीरे वे गुरु नानक के नाम से प्रसिद्ध हो गए। उनके जीवन से संबंधित अनेक घटनाएँ प्रसिद्ध है, जिससे लोगों को विश्वास हो गया कि वे वास्तव में असाधारण ईश्वरीय शक्ति थे। उन्होंने धार्मिक आडम्बरों का खुल कर खण्डन किया। एक बार वे घूमते हुए हरिद्वार पहूंचे वहाँ उन्होने तीर्थ यात्रियों को सूर्य की ओर जल फेंकते हुए देखा। पूछने पर उन्होंने बताया कि वे अपने पूर्वजों की आत्मा के लिए जल फेक रहे है। गुरु नानक देव जी ने बिना एक शब्द कहे विपरीत दिशा में जल फेकना शुरु किया। उनके इस कृत्य पर सबको बडा आश्चर्य हुआ। पूछने पर उन्होने बताया कि वे पंजाब में उनकी खेती के लिए पानी फेक रहे है। लोगों ने कहा, कैसी मूर्खता है? कहीं हरिद्वार से पानी पंजाब तक जा सकता है। गुरु नानक देव जी ने कहा कि सूर्य जो करोडो मील दूर है, जब वहाँ तक तुम लोगों का पानी पहुँच सकता है तो क्या कुछ सौ गज दूर नही जा सकता। सुनकर वे तीर्थ यात्री प्रभावित हुए बिना न रहे।

एक बार यात्रा करते हुए वे देश के बाहर मक्का, मदीना व बगदाद गए। कहा जाता है कि मक्का में वे एक बार काबा की ओर मुँह करके सो गए। वहाँ के एक अधिकारी ने देखा तो बहुत बिगडा और बोला "मूर्ख तू कौन है जो इस तरह खुदा के घर की ओर पैर करके सोया है। गुरु नानक ने विनम्र शब्दों में कहा "मुझसे गलती हो गयी भाई" जिधर खुदा का घर न हो, उस ओर मेरे पैर कर दे। कहा जाता है कि जब अधिकारी ने क्रोध में आ कर उनके पैर घुमाने शुरु किये तो जिस ओर गुरु नानक के पैर घूमते उसी ओर उस अधिकारी को काबा दिखाई देता। अन्त में वह थक कर उनके चरणों पर गिर पडा तथा समझ गया कि वे कोई सिद्ध पुरुष है।

इसी प्रकार भ्रमण करते हुए उनकी आयु ५२ वर्ष की हो चुकी थी अतः उन्होंने कर्तारपुर में रहने का निश्चय किया। वहाँ भी करोडो की संख्या में लोग उनके दर्शन तथा प्रवचनों का लाभ उठाने के लिए आने लगे। वहाँ उन्होंने "लंगर" का श्री गणेश किया। जहाँ प्रत्येक, मेहनत तथा मानव प्रेम से ओत-प्रोतन व्यक्ति मुफ्त भोजन प्राप्त कर सकता था। यहीं उन्होंने लहना नामक एक बालक को अपना शिष्य बनाया जो बाद में गुरु आनंद के नाम से उनकी गद्दी का उत्तराधिकारी हुआ।

श्री गुरुनानक देव जी सिक्ख धर्म के आदि गुरु है उनके बाद नौ गुरु और हुए। दसवें गुरु श्री गुरु गोविंद सिंह जी थे। उन्होंने गुरु नानक तथा दूसरे गुरुओं तथा संतों की वाणी का संग्रह किया जो "गुरुग्रंथ साहब" के नाम से प्रसिद्ध है। गुरुद्वारों में गुरुग्रंथ साहब को बडे आदर के साथ पवित्र स्थान पर रखा जाता है। आज लगभग ४०० साल बाद भी गुरुनानक की वाणी भारतीयों को सदाचार का पाठ पढाती है।

२२ दिसम्बर १५३९ ई.में. ७० वर्ष की आयु में उन्होंने अखंड समाधि ग्रहण कर इस नश्वर शरीर को त्याग दिया तथा मानव जाति के लिये आमूल्य संदेश छोड गए कि अच्छी जाति उसी की है जो अच्छे काम कर मानवता की सेवा करे। उनके अंतिम संस्कार के लिए हिन्दू व मुसलमान आपस में लडने लगे। परन्तु कहा जाता है कि जब उनके शरीर पर से सफेद चादर उठाई गई तो वहाँ सिवाय फूलों के कुछ भी न था। यह श्री गुरुनानक के उन अनुयाइयों के लिए अन्तिम संदेश था जो उनकी मूल भूत शिक्षाओं को समझ नही पाए थे।

नानक के दार्शनिक सिद्धान्त विशेषतः कबीर के सिद्धान्तो से प्रायः मिलते-जुलते है। एकेश्वरवाद, हिन्दू-मुसलमानों में एकता और मूर्तिपूजा का बहिष्कार पर नानक ने विशेष जोर दिया। परमात्मा सर्वव्यापी है, घट-घटवासी है। वह अनंत, अखण्ड, अभेद, असीम, अनादि है।

**कु. मोहने मिना हेमंत**

**टी.वाय.बी.ए.**

*****

# विद्यार्थी जीवन



मनुष्य जीवन का श्रृंगार विद्यार्थी जीवन है। विद्यार्थी जीवन सरस, आनंदपूर्ण और उत्साह-उमंगो से परिपूर्ण होता है। यह जीवन का उज्ज्वल पक्ष है। जीवन का स्वर्ण काल है।

प्राचीन काल में गुरुकुल शिक्षा प्रणाली थी। जहाँ विद्यार्थी जाकर रहता था और आचार्य या गुरु के अनुशासन में शारीरिक, आत्मिक विकास की शिक्षा प्राप्त करता था। यहाँ उसका विकास एकांगी नहीं सर्वांगीण होता था। शिक्षा के साथ व चारित्रिक आदर्श प्राप्त करता था जो शिक्षा का प्रमुख ध्येय है।

विद्या का अर्जन करना विद्यार्थी जीवन का मुख्य उद्देश्य है। जीवन का सही अर्थ समझकर, जीवन को सफल-सार्थक बनाने के लिए व्यक्ति जो कुछ ज्ञान प्राप्त करता है, व्यापक अर्थ में इसे ही विद्या कहते है और उसके इच्छुक को विद्यार्थी कहा जाता है। वास्तव में जिसमें ग्रहण करने की इच्छा एवं शक्ति है। वही विद्यार्थी है।

आज की शिक्षा पद्धति विद्यार्थी जीवन की सार्थकता को पूर्ण नहीं करती। विद्यार्थी केवल डिग्रीधारी बन गया है। उसका बौद्धिक, नैतिक, चारित्रिक विकास नही हो पाता है। उसमें चेतना, जागरुकता, स्फूर्ति, आशा, उत्साह, धैर्य, सहनशीलता, कर्म करने की भावना इत्यादी जीवनोपयोगी गुणों के विकास करने का प्रयास नहीं किया जाता फलस्वरुप आज का विद्यार्थी जीवन के प्रति तटस्थ हो गया है, अशांत हो गया। विद्यार्थी जीवन की मन:स्थिती का वर्णन करते हुए किसी ने कहा है -

"ज्ञान दूर कुछ कर्म भिन्न
इच्छा कैसे पूरी हो मन की,
एक दूसरे से मिल न सके,
यह विडम्बना है जीवन की।"

इस विडम्बना के लिए सामाजिक और राष्ट्रीय वातावरण जबाबदार है। आज समाज में अनीति, भ्रष्टाचार, भाई-भजीजावाद, स्वार्थ का बोलबाला है। राष्ट्रीय - चरित्र का अभाव है। हमारे तथाकथित नेता अपने पुत्र-पुत्रियों एवं नातेरिश्तेदारों को परीक्षा में अधिक अंक दिलवाने के लिए प्रयत्न करते है परिणामस्वरुप विद्याथियों की मानसिकता भी उसी दिशा में कार्य करती है और स्वाभाविक भी है। विद्यार्थी जीवन तो कच्ची मिट्टी के लोंदे के समान होता है। यह तो बनानेवाले पर निर्भर करता है कि वह उसे किसी प्रकार का रुप दे। आज उसे स्वरुपवान बनाने का प्रयत्न नही किया जाता।

माता-पिता शिक्षक, विद्यार्थी से यही अपेक्षा करते है कि वह पुस्तकों को रट डाले और जैसे भी हो अधिक से अधिक अंक प्राप्त कर डाक्टर, इंजिनियर जैसे गल्ला भरनेवाले व्यवसाय में प्रवेश करे। अत:विद्यार्थी की मानसिकता भी उसी दिशा में कार्य करती है और उसका शारीरिक, बौद्दिक एवं चारित्र्यिक विकास नही हो पाता है। आत्मचिंतन का महत्त्व ही समाप्त हो गया है। विद्यार्थी जीवन अपरिपक्व होता है उसमे जोश अधिक होता है होश कम अत उसे सही दिशा दी जाये तो वह सुमार्ग पर चल सकता है। अधिकांश विद्यार्थी समाज और राष्ट्र के लिए कुछ करना चाहते है। राष्ट्रीय छात्र सेना में रहकर वे साहसिक कार्य करते है, राष्ट्रीय सेवा योजना में सहभागी होकर सामाजिक विकास के लिए तन-मन से सेवा करते है। रक्तदान जैसे पुनीत कार्य करते है। वही

वाद-विवाद स्पर्धा, संगीत स्पर्धा, नाट्य, सांस्कृतिक आयोजनों में महत्वपूर्ण कार्य करते है। वह जिज्ञासु-प्रवृत्ति का होता है। वह मूलतः अनुशासन प्रिय है।

प्रश्न यह है कि अनुशासन - प्रिय विद्यार्थी फिर अनुशासन हीन क्यों हो जाता है। इसका कारण उसे योग्य शिक्षा नही दी जा रही है। परीक्षोपयोगी विद्या जीवन के लिए निरर्थक साबित हो चुकी है। शिक्षक भौतिकवादी हो गया है, वह विद्यार्थियों से ज्ञान की, अच्छे चरित्र की नही पैसे की अपेक्षा करता है। अतः आज 'ट्युशन् का भूत, समाज पर हावी हो गया है। अर्जुन के कारण द्रोणाचार्य एकलव्य के अँगूठे काट रहे है। विद्यार्थी जीवन में 'शार्ट-कर्ट' को अधिक महत्व प्राप्त हो गया है।

विद्यार्थी-जीवन में राजनैतिक जागृति तो होनी चाहिए परन्तु यह जीवन राजनीति का केन्द्र नहीं होना चाहिए। विभिन्न राजनैतिक दलों के आश्रित विद्यार्थीसंघ शिक्षा केन्द्रों का वातावरण अधिक कलुषित कर रहे है। प्रत्येक महाविद्यालय और विश्वविद्यालय किसी न किसी राजनैतिक दल के गढ बन गए है। शक्ति परीक्षण के लिए आंदोलन किये जा रहे है। कई शिक्षा केन्द्र महिनों बन्द रहते है। अतः विद्यार्थी की स्थिती "खाली दिमाग शैतान का घर" के समान हो गई है।

हमारे मनोरजन के साधन विशेषकर चित्रपट उसे हिंसा, कानून हाथ में लेना, ऐश्वर्य-विलास की चमक-दमक, स्त्री-जाति के प्रति उपभोग्य दृष्टिकोण अश्लीलता की ओर ले जा रहे है। मनोरंजन के स्थान पर युवा वर्ग को और राष्ट्र को पतन की ओर ले जाने का कार्य कर रहे है। गन्दी, अश्लील पत्रिकाओं एवं पुस्तकों का कच्चे मन पर प्रभाव होना स्वाभाविक है।

स्वार्थरत्, स्वकेन्द्रित सामााजिक एवं राष्ट्रीय मनोवृत्ति में विद्यार्थी कैसे अनुशासन और आदर्श में रह सकता है। यह निर्विवाद सत्य है कि आज का विद्यार्थी पहले से कहीं अधिक बुद्धिमान, जिज्ञासु, सजग और भविष्य के प्रति जागरुक है। यदि उसे उन्नति के अवसर और योग्य मार्गदर्शन प्राप्त हो तो वह अपने विद्यार्थी जीवनम को सुन्दर और सुमधुर बना सकता है। 'आज का विद्यार्थी कल का नागरिक है' यह घोषणा सत्य है। परन्तु उस कल के नागरिक को आज योग्य रुप में ढालना आवश्यक है। इसके लिए शिक्षा-प्रणाली में सुधार की भाषणबाजी न करते हुए प्रत्यक्ष कार्य करना चाहिए। शिक्षा प्रणाली व्यवसायाभिमुख होनी चाहिए ताकि कल के बेकारी की चिंता विद्यार्थी जीवन में न हो। शिक्षा को परीक्षोपयोगी ही न रहने दे। विद्यार्थी जीवन में शारीरिक विकास के पूर्ण अवसर व सुविधा दी जाए। उसके बौद्धिक विकास व चारित्रिक विकास कौ दृष्टि में रखकर पाठ्य पुस्तकों का चुणाव हो। विद्यार्थी को आत्मचिंतन का समुचित अवसर प्रदान किया जाये। राष्ट्र की स्वतंत्रता की बलिवेदी पर प्राण बलिदान करने वाले आदर्श उसे अनिवार्य रुप से पढाये जायें। उसमें राष्ट्र के प्रति प्रेम उत्पन्न करने की दृष्टि से शिक्षा पद्धति का गठन किया जाये। केवल विद्याथियों को दोष देकर समाज तटस्थ बना रहे यह उचित नहीं है।

भारत शिक्षा के क्षेत्र में अग्रणी रहा है। इस राष्ट्र का एक सांस्कृतिक इतिहास है अतः 'कल के नागरिक' की ओर विशेष ध्यान दिया जाए।

**कु. जाधव रुपाली हरिष**

**टी.वाय.बी.ए.**

*****



## शाळा

माझी ती गावातली कौलारू शाळाच बरी होती,
ती शिक्षणानं खरी होती.
अरे भिंती होत्या बांधलेल्या जरा कच्च्या,
खर तर तिथंच घडायच्या आयुष्याच्या पायऱ्या पक्क्या
शाळेचा डिजिटल नाही पण बोलक्या असायच्या
भिंती आणि फळा,
फुलायचा तिथंच ज्ञानाचा सुंदर मळा.
शाळेत असायचे गुरुजी असायच्या बाई,
जणु मायेनं गोंजणारी दुसरी आई.
नव्हत्या कधी शाळेत लाद्या की बसायला बाक,
आज ही आनंद वाटतो ऐकून गुरुजींची हाक.
पुस्तकात धडा वाचावा तसे
गुरुजी वाचायचे आमचे चेहरे,
घरी कितीही गरिबी असली
तरी गुरुजी घडवायचे खण खणीत मोहरे.
शाळेतली मित्र म्हंजी मौज मस्तीचा खाऊ,
किती गोड वाटायचं तेव्हा
सारे मिळून गायचो कविता
आम्ही सारे बहिण भाऊ.
शाळेला सुट्टी म्हणुन मित्र घ्यायचे कट्टी
आईतवारीही चिचच्या माळाव भेटायच,
इतक होते हट्टी.
चिप्स, बिस्कीट कसलं काय होतं डब्यात,
पोर कितीही भांडखोरअसली तरी
शिक्षकांच्या असायची ताब्यात.
कितीही रेमटवला पोराला शाळेत,
तरी पोरग दुसऱ्या दिशी
हजरचं असायचं शाळेच्या वेळेत.
छडीचाही जबर धाक असायचा,
म्हणुनच की काय वार्ताफलकावर
अनेकांना घडवल्याचा दाखला दिसायचा.
खरचं आजही लावते लळा,
ती आवडते मला माझी शाळा.

*****

## स्त्री शक्तीचा जागर

मातृत्वाचे ममत्व हे सांभाळूनी मी घेतले
नारी शक्तीचे पूर्णत्व स्वतःत मी जागविले....
घर, संसार, नोकरी सर्वांगीण पार केले
चंद्रावर जाऊनिया नवे आकाश निर्मिले....
हिणवले सगळयांनी तुच आहेस अबला
धैर्यवान नारीचाच इतिहास हा घडला....
आज या जगात आहे हिरकणी , नारायणी
रौद्र स्वरूपातली ती दुर्गादेवी मृगराणी....
स्त्रीच्या शक्तीचा जागर दाही दिशांना दिसला
तिच्या अनेक रुपांनी छळवाद संपवला...

*****

## जीवन

कणाकणांचे मिलन असे, मायेच्या त्या गर्भी;
जीवन अशी ही पदवी, ज्यासी मिळते प्रारंभी !!
उभारलेल्या वाटेवरती, मग सुरू होते ती खेळी;
अन् इवल्याशा त्या पावलांवर,
पडते कर्तृत्वाची झोळी !!
एक एक त्या कर्तृत्वाची, मग सुरू होते मोजणी;
अन् अविरत पसरणाऱ्या विचार वृक्षास,
बसते कायमची टोचणी !!
मोहक अशी मग आयुष्याची, स्वप्ने सारी पडू लागतात;
अन् जबाबदारीच्या त्या वळणांवर,
बोलककाटे मात्र रुतु लागतात !!
मध्यांतरात त्या जीवनाच्या,
कोडी भविष्याची पडू लागतात;

अन जीवनपुष्पाच्या स्वच्छंदी पाकळया,
एकाकी मग झडू लागतात !!
प्रवास साऱ्या आठवणींचा,
जीवनोत्तरी मग होऊ लागतो;
अन् विस्कटलेल्या त्या जीवनाचा,
खरा गुन्हेगार उलगडू लागतो !!

*****

## आई माझी गुरू

आई माझी गुरु, आई कल्पतरु, आई सुखाचा सागरु,
पण मोबाइलच्या दर्शना-विना दिवस होत नाही सुरु
आहे मोठे शस्त्र सगळ्यांशी येते आता भांडता,
माहित असते हे एकलव्याला
तर दिलाच नस्ता गुरुंना अंगठा
गुरुर्ब्रम्हा, गुरुर्विष्णु झाले आता जुने,
शिक्षकांना बाहेर भेट सांगणारे वाढले बघा नमुने
यूट्यूब, फेसबुक वर सर्च करताच भेटतो सर्व ज्ञान,
आठवा आज त्यांना, ज्यांच्या संस्काराने
जीवन झाले महान
मास्तराच्या छड़ीवर अपराधांचा गनिमी कावा झाला,
मुलांच्या गृहपाठात बापच स्वतः विद्यार्थी झाला
आजच्या या पर्वावर गुरुंना भेटुनी करावे
अभिवादन व प्रणाम,
किती स्टेटस ठेवले आपण हे बघण्यातच
गुरूपौर्णिमा झाली महान....

*****

## निसर्ग

सूर्य चंद्र तारे| नभ खुलवतो| ऊठुन दिसतो| इंद्रधनु||
धरती मातेची| रूपे ती हजार| डोंगर उतार| सामावले||
पडती पाऊस|बिज अंकुरते| फुलून बनते|स्वावलंबी||
खवळे समुद्र|उठती त्या लाटा|
विस्कटती वाटा|क्षणार्धात||
संथ ती वाहते|सर्वां सामावते|
गारवा फैलावते| कृष्णा माई||
क्षोम वितळतो| निसर्गा संगती
प्रकाश भेटति| अंतर्बाह्य||
जादुई निसर्ग| खुलवतो मन|
प्रफुल्लित तन|करतसे||
फुले सुगंधित। मनाला दिलासा।
वाटतो हवासा। दैनंदिन।।
डोलतात नित्य। गवताची पाती।
जिव्हाळयाची नाती|वाटतात

*****

## बटाटा

बटाट्याचे उपयोग
स्वयंपाकघरात गाल फुगवून बसला होता बटाटा
अंगावरल्या डोळयांनी मला पाहत होता ||
माझ्याशी बोलायला लागला तो जेव्हा
खरे नाही वाटले मला तेव्हा
तुम्हालाही वाटेल मी सांगे हा प्रसंग खोटा ||
खाण्यामध्ये उपयोग माझे आहेत खूप मोठे
तरी तुम्ही का बोलतात डोक्यात आहे कांदे बटाटे
नाकाने सोलाल कांदे तर आहे तुमचाच तोटा ||
कांद्याचे वाढले ना रे बाजारी भाव
चढ्या दराने गंजले सारे रंकराव
आता मला आला आहे मान मोठा ||
कधीही मी कामी येई जेव्हा नसे भाजी ताजी
कोणत्याही भाजीत मिसळून जाण्या मी राजी
बहुगुणी असा सगळया भाज्यांत शहाणा मोठा ||
माझी करा रस्सा भाजी सुकी भाजी मटार बटाटा भाजी
किंवा करा मिक्स भाजी नाहीतर पाव भाजी

कुक्करमध्ये उकडून घ्या किंवा मेथी पालकात टाका ||
खिचडीत टाका बघा चव कशी छान न्यारी
वांगी बटाटा भाजी आवडीने खातात सारी
माझ्यासवे बनवा सार भाजी घेवून टमाटा ||
माझे बनवा वेफर्स, फिंगर चिप्स, काप कापून
छोटे उद्योग झालेत मोठे त्या साऱ्याला विकून
पिकवून शेतकरी व्यापारी हाती मोजती नोटा ||
इतक्यात घाईने आई आली स्वयंपाकघरात
प्रश्न विचारी आज काय देवू तुला डब्यात?
बटाटा कर मी म्हटले अन केला त्याला बाय बाय टाटा||

*****

## शिक्षण

भय-रहित भव-सिन्धु तरना सीख ले कोई यहाँ ।
विश्व में आकर विचरना सीख ले कोई यहाँ ।।
ज्ञान पूर्वक, भक्ति पूर्वक कठिन कर्म-क्षेत्र में,
चाहिए कैसे उतरना ? सीख ले कोई यहाँ।
मुक्ति तो है साथ ही हम सर्वदा स्वच्छन्द हैं,
वासना बंधन-कतरना सीख ले कोई यहाँ ।।
कर्म हैं जितने सभी प्रभु नाम पर होते रहें,
एक मन से ध्यान धरना सीख ले कोई यहाँ ।।
आपदा में, सम्पदा में, हर्ष में या शोक में,
चित्त को चंचल न करना सीख ले कोई यहाँ ।
जानते हैं हम कि है आचार की सीमा कहाँ,
पुण्य कभाण्डार भरना सीख ले कोई यहाँ ।।
त्याग में सर्वस्व क्या, उत्सर्ग करना आप को,
स्वार्थ से सर्वत्र डरना सीख ले कोई यहाँ ।
ऋृषि जनों की रीति थी-अपने लिए जीते न थे,
प्रेम में निर्मोह मरना सीख ले कोई यहाँ ।।

*****

## अपनी भाषा

करो अपनी भाषा पर प्यार ।
जिसके बिना मूक रहते तुम, रुकते सब व्यवहार ।।
जिसमें पुत्र पिता कहता है, पतनी प्राणाधार,
और प्रकट करते हो जिसमें तुम निज निखिल विचार ।
बढ़ायो बस उसका विस्तार ।
करो अपनी भाषा पर प्यार ।।
भाषा विना व्यर्थ ही जाता ईश्वरीय भी ज्ञान,
सब दानों से बहुत बड़ा है ईश्वर का यह दान ।
असंख्यक हैं इसकउपकार ।
करो अपनी भाषा पर प्यार ।।
यही पूर्वजों का देती है तुमको ज्ञान-प्रसाद,
और तुमहारा भी भविष्य को देगी शुभ संवाद ।
बनाओ इसे गले का हार ।
करो अपनी भाषा पर प्यार ।।

*****



# William Wordsworth As a Romantic Poet



William Wordsworth, one of the greatest poets in England and widely known as poet of Nature. He was born at Cockermouth, in Cumberland, on April 4th 1770. Wordsworth was a revolutionary in his poetic aim and his poetic guidance. His poetic career a period of more than sixty years. Wordsworth's poetic career is divided into four periods the early period, the period of gloom, the glorious period and the period of decline. The Romantic Movement of the early nineteenth century was a revolt against the classical tradition of the eighteen century; but it was also marked by certain positive trends. Wordsworth was, of course, a pioneer of the romantic movement of the nineteenth century.

William Wordsworth's poetry exhibits Romanitc Characteristic and for his treatments towards romantic elements, he was supreme and he can be termed a romantic poet for a numbers of reasons.

**Imagination :** Imagination is the integral parts of Romantic Poetry. We can find imagination in many poetries of William Wordsworth. The 18th Century poets used to put emphasis much on a 'wit' 'but' the Romantic poets like Wordsworth used to put emphasis on 'Imagination'. He used imagination so that the common things could be made to look strange and beautiful through the play of imagination. In his famous poem 'Intimation Ode', here he says,

*"There was a time when meadow grow and stream, the earth And every common sight, to me did seem appareled in celestial light."*

Moreover, in this poem, we can see sequence of picture through his use of imagination. He also says, *"The rainbow came and lovely is the rose; the moon doth withdelight look arund her when the heavens are bare."*

Similarly, in the poem, *"Tintern Abbey,"* the sees the river, the streams, steep and lofty cliffs through his imaginative eyes. He was enthusiastically charmed at the rolling river. Here he says,

*"Once again Do I behold those and lofty cliffs that on a wild secluded scene impress Thoughts of more deep seclusion and connect The landscape With quiet of the sky."*

In this poem, the poet seems that the nature has a healing power. Even the recollection of nature soothes the poet's trouble. The poet can feel the existence of nature though imagination even when he is away from her. He says,

*"In lonely rooms and cities, I have owed to them,*

*In hours of weariness, sensation sweet"*

**Nature -** Wordsworth is especially regarded as a poet of nature. In most of the poems of Wordsworth nature is constructed as both a healing entity and a teacher or moral guardian. Nature is considered in his poems as a living personality. He is a true worshiper of nature: nature's devotee or

high priest. The critic Cazamian says, "To Wordsworth, nature appears is a formative influence superior to any other, the shower in our hearts of the deep laden seeds of our feelings and beliefs." He dwells with great satisfaction, on the prospects of spending his time in groves and valleys and on the banks of streams that will lull him to rest with their soft murmur.

Wordsworth says *"Nature never did betray the heart that loved her."* As a poet of Nature, Wordsworth stands supreme. He is a Worshipper of Nature, Narure devotee and spirit to him. His love for Nature is probably true and more tender than of any other English poet and writer. Nature comes to occuoy in his poem a separate or independence status and is not treated in the casual or passion manners as by poet before him. Wordsworth has full of philosophy, a new and original views for nature. Wordsworth regarded Nature a great moral teacher, as a best mother, guardian and nurse of man.

**Subjectivity -** Subjectivity is the key note of Romantic poetry. Wordsworth expresses his personal thoughts through his poems. In *"Ode: Intimation of Immortality"* the poet expresses his own/ personal feelings. Here he says that he can't see the celestial light anymore which he used to see in his childhood. He says, *"It is not now as it hath been of yore."*

**Lyricism -** In William Wordsworth's poetry we can observe the element of lyricism that predominant during the time. He has written fine lyics which are the non narrative and the poet expresses his state of mind or his feelings. Sometime the poet addresses to another person. The best example of lyricism is Tintern Abbey which is largely subjective.

**Melancholy -** Wordsworth was dissatisfied individual. He was dissatisfied with the circumstances of his own life so we can find the pessimistic tone in his poetry. His poetry tries to escape from reality and tuned into the imaginational world of his own creation. We can easily find in the poem 'Lucy Gray' the aliention of Lucy wanders in the forest having no company. She is lost in the forest whrere her parents search her lot but they failed to catch her. The feeling of lost daughter we can minutely observe in pessimistic tone. He sings,

*"they wept-and turning home word,*
*cried in heaven we shall meet her"*

**Simplicity of Style -** The artificial mode of writing poetry was adopted in the 18th century is called the Neo-classical poetry which was difficult to understand but the poetry of William Wordsworth and other of Romantic period are easy to understand and mostly simple in style, Wordsworth wrote freely. He used spontaneous way of expressing feeling and thoughts. his poetry was nothing but the expression of inner urges of his thoughts. He did not bother about the rules and regulation of poetry.

William Wordsworth gave free expression to his emotion in all his poetries. Apart from this all features we can find sensibility, primitivism, Interest in the past, mysticism and individualism in the poetry of William Wordsworth that all mention aspect shows that Wordsworth was the spirit of Romantic Poet.

**Miss. Sushma Suryawanahi**
**(FYBA)**

*****

## Each Moment is Precious

Live in the moment, Just take it all in.
Pay attention to everything,
Right there and right then.
Don't let your mind wander
To what's coming next.
Cherish this moment
And give it your best.
Don't let tomorrow
Make you rush through today,
Or too many great moments
Will just go to waste.
And the person you're with,
In that moment you share,
Give them all of your focus;
Be totally there.
Laugh till it hurts, Let the tears drop.
Fill up each moment
With all that you've got.
Don't miss the details;
The lesson is there.
Don't get complacent;
Stay sharp and aware.
It can take but a moment
To change your life's path.
And once it ticks by, There is no going back.
In just 60 seconds,
You may make a new friend.
Find your true love,
Or see a life start or end.
You become who you are
In those moments you live.
And the growth's not in taking
But in how much you give.
Life is just moments,
So precious and few.
Whether valued or squandered,
It's all up to you!

*****

## What Life Should be?

To learn while still a child
What this life is meant to be.
To know it goes beyond myself,
It's so much more than me.
To overcome the tragedies,
To survive the hardest times.
To face those moments filled with pain,
And still manage to be kind.
To fight for those who can't themselves,
To always share my light.
With those who wander in the dark,
To love with all my might.
To still stand up with courage,
Though standing on my own.
To still get up and face each day,
Even when I feel alone.
To try to understand the ones
That no one cares to know.
And make them feel some value
When the world has let them go.
To be an anchor, strong and true,
That person loyal to the end.
To be a constant source of hope
To my family and my friends.
To live a life of decency,
To share my heart and soul.
To always say I'm sorry
When I've harmed both friend and foe.
To be proud of whom I've tried to be,
And this life I chose to live.
To make the most of every day
By giving all I have to give.
To me that's what this life should be,
To me that's what it's for.
To take what God has given me
And make it so much more
To live a life that matters,
To be someone of great worth.
To love and be loved in return
And make my mark on Earth.

**Miss. Ashwini Jadhao (S.Y.B.A)**

*****




रक्तगट तपासणी शिबीर प्रसंगी विद्यार्थीनीस सन्मानीत करतांना प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार




स्वामी विवेकानंदांचे विचार या विषयावर मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार.



राष्ट्रीय फुटबॉल प्रसंगी स्पर्धेचे उद्घाटन करतांना प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार, प्राध्यापक व खेळाडू विद्यार्थी.



सांस्कृतिक कार्यक्रम प्रसंगी बक्षिस प्रदान करतांना मा.श्री. नितीनभाई मणिलाल शाह व इतर मान्यवर.



गांधी विचार परीक्षेस पर्यवेक्षण करतांना प्रा.डॉ. विजय ग. गुरव.



आंतर महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेत सहभागी विद्यार्थी.

# अहवाल विभाग

## विद्यार्थी विकास अहवाल

### वार्षिक अहवाल - शै. वर्ष २०१७-१८

**प्रा. के. डी. सोनवणे**

**विद्यार्थी विकास अधिकारी**

आमचे आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथील विद्यार्थी विकास विभागाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विविध उपक्रम घेतले. तसेच दि. दि. १३ जुलै २०१७ या दिवशी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांच्या हस्ते विद्यार्थी कल्याण विभागाचे उद्घाटन करण्यात आले व नवीन मतदार नाव नोंदणी कार्यक्रम घेण्यात आला. तसेच विद्यार्थी विकास विभागामार्फत विविध महाविद्यालयामध्ये संघ पाठविण्यात आले ते पुढीलप्रमाणे

१) दि. ७, ८ व ९ सप्टेंबर २०१७ रोजी डॉ.आर.डी. देवरे कला व महाविद्यालय म्हसदी येथे श्रम संस्कार व नेतृत्व विकास शिबीरासाठी पाच विद्यार्थी पाठविण्यात आले.

